म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय ..वा..वा..
दा. क्र. 2८४2

BVBK-0402842

जनपदकथामाला : ५

# उग्र पांड्य

पं. महादेवशास्त्री जोशी

□

BVBK-0402842

अनमोल प्रकाशन, पुणे २.

मूल्य दहा रुपये

प्रकाशक : मो. द. नांदुरकर, अनमोल प्रकाशन,
६८३ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.

मुद्रक : स. श्री. शिंगरे, श्री-नंदा प्रिंटर्स,
११३७/३ शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

© पं. महादेवशास्त्री जोशी

आवृत्ती पहिली : १९७६

म. वं. सं. ठाणे. वाङ्मयालय ठाणे.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २८४२ दिनांक ९/५/८३
विषय बा.वा. क्र.......

# उग्र पांड्य

मदुरेचा राजा सुंदर पांड्य. याचा उग्र पांड्य हा कुलदीपक पुत्र. तो वयात येताच दोन चांगल्या घटना घडल्या. प्रथम त्याचे लग्न झाले आणि नंतर त्याचा राज्याभिषेक झाला. चोल-राजा सोमशेखर हा कांची नगरीत राज्य करीत होता. उग्र पांड्याचे शौर्यधैर्यादी गुण त्याच्या कानी आले आणि तो आपल्या मुलीला घेऊन मदुरेला आला. त्याची मुलगी कांतिमती नावा-प्रमाणेच रसरशीत होती. अतिशय देखणी होती. चांगल्या संस्कारात वाढली होती. पहिल्याच भेटीत ती सर्वांना आवडली. उग्र पांड्य आणि कांतिमती यांचे राजवैभवात लग्न लागले.

सुंदर पांड्याने दुसरा मुहूर्त धरला तो राज्याभिषेकाचा. त्याला आता मुलाच्या हाती राज्यकारभार सोपवण्याची घाई झाली होती.

तोही समारंभ धुमधडाक्यात झाला. समारंभानंतर उग्रपांड्य जेव्हा राजाला नमस्कार करायला आला, तेव्हा राजाने त्याला तीन वस्तू भेट म्हणून दिल्या. त्यांपैकी एक होते वलय, दुसरी होती शक्ती. ही दोन शस्त्रे आणि तिसरे होते चेंडा नावाचे वाद्य.

नंतर राजा-राणींनी सर्वांचा निरोप घेतला. सर्वांना आशीर्वाद दिले. राणी मीनाक्षीच्या मंदिरात गेली आणि मूर्तीत विलीन झाली. राजा सुंदरेश्वराच्या लिंगात अंतर्धान पावला. आणि उग्र-पांड्यावर राज्याची सर्व जबाबदारी आली.

उग्र पांड्याने प्रथम राज्याची नवी व्यवस्था लावली. सगळ्या अधिकाऱ्यांत आणि कर्मचाऱ्यांत चैतन्य आणले. प्रजेला उद्योगाची आणि श्रमांची गोडी लावली. आणि मग त्याने अश्वमेध यज्ञाचा घाट घातला. त्यासाठी एक सुंदर अबलख घोडा निवडला. त्याच्यावर खोगीर घातले. वर पताका लावली. तिच्यावर एक लेख लिहिला—

“ हा घोडा उग्र पांड्याने सोडला आहे. ज्याला ताकद असेल त्याने याला धरावे आणि युद्धाला तयार व्हावे. नाही तर खंडणी देऊन उग्र पांड्याचे मांडलिक व्हावे.”

घोडा सुटला. पुरोहितांनी त्याच्या प्रयाणचे मंत्र म्हटले. सेनापती घोड्याच्या मागे उभा राहिला. सेनापतीच्या मागे सैन्य खडे झाले. घोड्याच्या मागोमाग सैन्यही चालू लागले. घोडा या राज्यातून त्या राज्यात जाऊ लागला. ज्यांनी तो पकडला,

त्यांचा उग्र पांड्याच्या सैन्याने लढून पराभव केला. पराभूत राजांकडून खंडणी वसूल केली.

असा हा घोडा वर्षभर हिंडून आणि जयपत्रे मिळवून परत मदुरेत आला. घोड्यामागून द्रव्याच्या राशी वाहून आणताना भारवाहकांच्या कमरा वाकल्या.

मग त्या द्रव्याने उग्र पांड्याने अश्वमेध पुरा केला. ऋत्विजांना दक्षिणा दिल्या. कलावंतांची संभावना केली. हजारो लोकांना अन्नदान केले. हजारोंचे आशीर्वाद घेतले.

असे एक नव्हे, दोन नव्हे तर शहाण्णव अश्वमेध उग्र पांड्याने पार पाडले. मदुरा जणू यज्ञनगरी बनली. सदैव यज्ञाचा धूर आकाशात तरळू लागला. वैदिक मंत्रांनी वातावरण भरून राहिले. निरनिराळ्या वाद्यांच्या गजरांनी आकाशाची कढई दुमदुमून गेली. इतर अनेक राज्यांतल्या गायकांची, नर्तकांची, नटांची, भिक्षुकांची मदुरेकडे रीघ लागली. मदुरा सर्व यांचकांचे मायपोट झाली.

उग्र पांड्याला अजून चार अश्वमेध करायचे होते. शंभर ही संख्या पुरी करायची होती. जो शंभर अश्वमेध करतो, त्याला स्वर्गाचे राज्य मिळायचे हा देवलोकीचा नियम होता. उग्र पांड्याला तेच साधायचे होते.

पण त्यामुळे स्वर्गात इंद्राचे धाबे दणाणले. त्याला वाटले की, अजून चार अश्वमेध पुरे करणे हा उग्र पांड्याच्या हातचा मळ आहे. मग तो वर येणार, मला खाली ओढणार आणि आपण

माझ्या सिंहासनावर बसणार! मग देवलोकावर त्याची सत्ता चालेल. मला मग कोणी विचारणार नाही. गंधर्व माझ्यासाठी गाणार नाहीत. अप्सरा माझ्या कटाक्षावर नाचणार नाहीत. कोणी मला उत्थापन देणार नाही. कोणी माझे काहीच ऐकणार नाही. माझे वज्र हे महान् शस्त्रसुद्धा माझ्या हातून उग्र पांड्याच्या हाती जाईल. मी मग कशाच्या जोरावर रुबाब दाखवायचा! छे:! हे घडू देता नये. उग्र पांड्याचे उरलेले चार अश्वमेध पुरे होऊ देता कामा नयेत. त्याच्यावर मोठेच विघ्न आणले पाहिजे. त्याला भयानक संकटात लोटले पाहिजे. होता की नव्हता असे केले पाहिजे.

आणि लगेच इंद्र त्या उद्योगाला लागला. त्याने वरुणाला बोलावून आणले.

"वरुणदेवा! समुद्र तुझा आहे ना?"

"आहे देवराज!"

"मग त्याला वाढायला सांग. मदुरेवर लोटायला सांग. मदुरा शहर सपाट झालं पाहिजे. माणसं, गुरंढोरं, घरंदारं, शेतं-भातं, सगळंच्या सगळं एका प्रहरात धुवून गेलं पाहिजे. मदुरा नगरीची नावनिशाणीसुद्धा राहता कामा नये."

"ते ठीक; पण एवढी संहारक शक्ती कशासाठी?" वरुणाने विचारले.

"हे राजकारण आहे. तू नीतीचा देव आहेस. सरळ मार्गाने

जाणारा आहेस. राजकारणातले पाचपेच तुला कळायचे नाहीत. तू फक्त माझी आज्ञा पाळ."

"मला हे पटत नाही. पण तुम्ही स्वर्गाचे अभिषिक्त राजे. सर्व देवांचेही अधिपती. मी केवळ पश्चिम दिशेचा सुभेदार. मला पटलं नाही तरी तुमची आज्ञा—"

"मग जा तर! आत्ताच्या आत्ता कामाला लाग."

वरुण 'जी सरकार' म्हणून तिथून निघाला. त्याने समुद्राला आज्ञा केली. समुद्राने उधाण आणले. एकेक लाट मोठी होऊ लागली. वाळवंटावर आदळू लागली. हळूहळू समुद्राने वाळवंटाची मर्यादा ओलांडली. त्याच्या लाटा नगराच्या जवळ जवळ येऊ लागल्या. फुटू लागल्या. नगरात घोघावत समुद्राचे पाणी शिरले. चहूबाजूंनी नगर बुडू लागले. समुद्राचा आवाज तरी केवढा प्रचंड! जणू शंकरच प्रलयकालचे तांडव करतो आहे.

मदुरेतले सगळे लोक गर्भगळित झाले. सुगावा लागू न देता हा त्यांच्यावर प्रलयकाल ओढवला होता. जो तो पळत सुटला. जे जेवत होते ते घास टाकून पळाले. जे जेवले होते ते न आच-वता पळाले. बायका पळाल्या, मुले पळाली, म्हातारीकोतारीही काठीची पर्वा न करता पळू लागली. सगळ्यांचा लोंढा आला तो राजवाड्याकडे. माणसांनी एकमेकांना चेंगरून मारावे एवढी माणसांची खेचाखेच झाली. राजवाड्याला प्रजेचा वेढा पडला. चहूबाजूंनी एकच आक्रोश– 'राजा! आम्हांला वाचव!!'


SARKAR

उग्र पांड्य राजा राजवाड्याच्या गच्चीवर आला. त्याने प्रजेला धीरगंभीर शब्दात आश्वासन दिले.

"प्रजाजनहो! भिऊ नका. असे आक्रोश करू नका. रडून-भेकून कोणतंही महान संकट दूर होत नाही. त्याला प्रतिकार केला पाहिजे. सारी शक्ती पणाला लावून त्याच्याशी झुंज दिली पाहिजे. चला, त्या उद्योगाला लागा. मी हे संकट एका घटकेत दूर करीन. पण मला तुमची ताकद, जिद्द दिसली पाहिजे. माझी प्रजा शेणामेणाची असता कामा नये. तिचा कणा ताठ पाहिजे. चला. जे जे काही साधन तुमच्या हाती येईल, ते ते घेऊन या. पर्वतप्राय लाटा थोपवण्याचा प्रयत्न करा. इथे कोणीही राहू नका ..."

आणि त्या आक्रोश करणाऱ्या लोकांत जे तरुण होते, तरुणी होत्या, त्यांनी कंबरा कसल्या. कोणी म्हाताऱ्याकोताऱ्यांना खांद्यावर घेऊन पाण्यातून बाहेर काढू लागले. कोणी ढासळत्या भिंती सावरू लागले. कोणी दगडा-धोंड्यांचे बांध रचू लागले. कोणी पडत्या झाडांचा आधार घेऊन वाहात जाणाऱ्या माणसांना बाहेर काढू लागले. ज्याला जे सुचेल ते तो करू लागला. उग्र-पांड्याने उंच सौधतलावरून ती धडपड, ती प्रयत्नांची पराकाष्ठा पाहिली. त्याला प्रजेचे ते मनोधैर्य पाहून फार फार बरे वाटले. तो फुसक्या बाहुल्यांचा राजा नव्हता, तर जिद्दी अन् धाडसी प्रजेचा राजा होता.

आता यापुढे प्रजेचा अंत पाहायचा नाही असे त्याने ठरवले.

त्याच्याजवळ अमोघ अस्त्र होते. त्याच्या वडिलांनी त्याला जी तीन अस्त्रें दिली होती त्यांत एक 'शक्ती' होती. उग्र पांड्याने ती हाती उचलली. मंत्र म्हणून ती भारली आणि 'इंद्रा, तुझा सत्तेचा अन् सामर्थ्याचा गर्व आता मी एका घटकेत शतचूर्ण करतो.' असे म्हणून ती शक्ती समुद्राच्या दिशेने फेकली. तिचा प्रचंड आवाज झाला. जणू ब्रह्मांडकटाहाला तडे जातील असे वाटले.

ती शक्ती समुद्राच्या लाटांवर आदळली. नव्या लाटा उंच होण्याच्या आतच आतल्या आत जिरल्या. एकेक लाट मागे मागे सरकू लागली. त्यांचा घनगंभीर आवाज मंदावला. एक मागे हटली, दुसरी हटली, असे करता करता समुद्र आपल्या मर्यादेत जाऊन बसला. उधाण संपले. समुद्र जणू गोगलगाय बनला.

मदुरेवरचे संकट टळले. पण त्या संकटाने पडझडही खूप केली होती. विनाश बराच झाला होता. कोणाचे घर पडले होते. कोणाचे शेत वाळूत रुतले होते. कोणाचे गोधन वाहून गेले होते. घरातली चीजवस्त भिजून चिंब झाली होती. भांडी-कुंडी वाळूत रुतून बसली होती. धान्य मातीत मिसळले होते.

उग्र पांड्याने त्या सर्व पूरपीडितांना सढळ हाताने मदत केली. भरला खजिना रिता करून त्यांचे पुनर्वसन केले. नवी घरे उभी झाली. नवे गोठे बांधले गेले. नवी चिरगुटे आली. नवे धान्य घराघरांतून भरले गेले. सारी प्रजा उग्र पांड्याला धन्यवाद देऊ

लागली. प्रजेच्या लेखी राजा देवमाणूस ठरला.

पण हे सर्व स्वर्गातून पाहात असता इंद्राची कपाळदुखी सुरू झाली. त्याला तो आपला असह्य अपमान वाटला. पृथ्वीवरचा एक माणूस समुद्र हटवतो, ही इंद्राच्या दृष्टीने गंभीर गोष्ट होती. उद्या कदाचित तो आपले सिंहासनही गदगदा हालवील असे इंद्राला वाटले. याचा बंदोबस्त केलाच पाहिजे, याला दुबळे बनवले पाहिजे, असे ठरवून त्याने उग्र पांड्यावर आणखी एक मोठा आघात करायचे ठरवले.

पाऊस हे इंद्राच्या हातातले एक मोठे अस्त्र. सगळ्या मेघांवर त्याची सत्ता चाले. पाऊस नाही म्हणजे सगळे जीवनच नाही. म्हणून त्याने मेघांच्या राजाला बोलावून आणले आणि आज्ञा दिली—

" मेघराज, पांड्य देशावरचा पाऊस बंद. मरू देत सगळ्या लोकांना. मरू दे त्या उग्र पांड्याला. "

" पण...... "

" पण काय ? "

" उग्र पांड्य शेजारच्या राज्यांतून– चोल देशातून, चेर देशातून– धान्य आणील. प्रजेला जगवील. "

" मग चेर आणि चोल या देशांवरचाही पाऊस बंद. "

" जशी आज्ञा ! " मेघराज म्हणाला.

त्याने तिन्ही राज्यांवरचे ढग बंद केले. पाऊसकाळ आला; पण पावसाचे नाव नाही. सगळे आकाश निळे निळे निरभ्र. महिना गेला, दोन महिने गेले, सगळा पावसाळा संपला. आकाशातून पाण्याचा एक थेंबही खाली आला नाही. नद्यानाले आटले. धुळीची वादळे सुरू झाली. घागरभर पाण्यासाठी लोकांना कोसन् कोस वाट तुडवावी लागू लागली. घरातले धान्य संपले. शेतात उगवलेच नाही. साठवणीचे होते ते खाऊन संपले. मग उपास. पोरा-बाळांचे आक्रंदन. मोठ्या माणसांचे उसासे. हे सगळे असह्य झाले. तेव्हा पुनः राजवाड्यावर प्रजेची गर्दी.

" राजा, अन्न दे. राजा, पाणी दे ! राजा, प्रजेचे प्राण वाचव ! राजा......राजा......! "

जी अवस्था पांड्य देशाची, तीच चोल देशाची, तीच चेर देशाची. सगळीकडे हाहाकार ! माणसांना आक्रोश करायचीसुद्धा शक्ती उरली नाही. म्हातारी माणसे पटापटा मरू लागली. जे काही थोडेबहुत उपलब्ध होते, त्याचा ओला कोरडा घास पोराबाळांच्या तोंडात गेला. मध्यम वयाची माणसे झाडपाला ओरबाडून कसाबसा प्राण टिकवून ठेवीत होती.

मग चोल, चेर आणि पांड्य देशांचे तिन्ही राजे एकत्र जमले. पण तोड काहीच निघेना. काय करावे तेच त्यांना समजेना ! तेव्हा उग्र पांड्य म्हणाला,

" आपण अगस्ती ऋषीकडे जाऊ. त्याला उपाय विचारू. "

अगस्ती हा दक्षिण दिशेचा पुरस्कर्ता होता. साऱ्या दक्षिणेला तो आपला आधारस्तंभ वाटे. तो मूळचा काशीत राहणारा. पण त्याने काशी सोडली आणि तो दक्षिणेत कायमचा राहायला आला. दक्षिणेत त्याने वैदिक धर्माचा प्रसार केला. लोकांच्या हरतऱ्हेच्या सुधारणा घडवून आणल्या. तिन्ही राजे भेटायला आले असता अगस्ती त्यांना म्हणाला,

" प्रसंग गंभीर आहे. मला इंद्राचा स्वभाव माहीत आहे. तो अशा तऱ्हेने बधणार नाही. तुम्ही समक्ष जाऊन त्याची भेट घेतली पाहिजे."

"पण ऋषिश्रेष्ठ! स्वर्गापर्यंत आम्ही सदेह पोचायचं कसं?"

" त्याला एक उपाय आहे. तुम्ही शिवाची आराधना करा. त्याच्याप्रीत्यर्थ यज्ञ करा. त्याचं पौरोहित्य मी करीन. त्या यज्ञाचा जो पवित्र धूर आकाशात जाईल, त्याच्या आधारे मी तुम्हांला देवलोकी पाठवीन."

तिन्ही राजांनी मिळून यज्ञाची तयारी केली. अगस्तीच्या सांगण्याप्रमाणे सर्व जमवाजमव झाली. होम हवन सुरू झाले. पूर्णाहुतीच्या वेळी धुराचे लोटच्या लोट गगनमंडळात झेपावले. त्या आधारे अगस्तीने तीन्ही राजांना इंद्राकडे पाठवून दिले. ते तिघेही सदेह स्वर्गात गेले आणि इंद्रासमोर उभे राहिले.

इंद्र सिंहासनावरून खाली उतरला. त्याने तिघांचेही स्वागत केले. तिघांच्यासाठी सुशोभित आसने मांडली. ती रत्नजडित

होती, मऊ मऊ सुखस्पर्श देत होती, पण ती इंद्राच्या सिंहासनापेक्षा उंचीला कमी होती. चोल आणि चेर या राजांना त्यांच्याविषयी काही वाटले नाही. ते दोघे इंद्राला नमस्कार करून त्यांवर आरामशीर बसले.

बसला नाही तो एकटा उग्र पांड्य. इंद्राच्या सिंहासनापेक्षा कमी उंचीच्या आसनावर बसणे हा त्याला आपला अपमान वाटला. तो सरळ पुढे गेला. आणि इंद्राच्याच सिंहासनावर त्याच्याशेजारी बसला. इंद्राला उग्र पांड्याची ही कृती झोंबली. पण तो त्याला ढकलून देऊ शकत नव्हता किंवा सेवकांच्याकरवी खाली ओढूही शकत नव्हता. कारण उग्र पांड्याचा प्रताप समुद्राला उधाण आल्यावेळी इंद्राला कळून चुकला होता.

पण इंद्राने एक गोष्ट केली. त्याने उग्र पांड्याकडे पाठ फिरवली आणि तो त्या दोन राजांकडे वळला.

" तुमच्या दर्शनाने मला खूप आनंद झाला आहे. आज स्वर्गाचा भाग्यदिवस उगवला असं मी समजतो. आता सांगा बरं, कां येणं केलंत ? "

" देवराज, गेली कित्येक वर्षे आमच्या राज्यांत पाऊस पडला नाही. आमची प्रजा अन्नपाण्याच्या अभावी तडफडायला लागली आहे. तरी—"

" हां समजलो ! माझ्या सिंहासनावर आरूढ झालेला हा उग्र पांड्य राजा किती उद्धट आहे ते तुम्ही पाहिलंत ना ? त्याचा

शेजार तुम्हांला बाधला....”

“ मग आम्ही आणि आमच्या प्रजेनं पाण्याच्या एका थेंबासाठी तडफडून मरायचं का? देवेंद्राला असा निर्दय निष्ठुरपणा शोभतो का?”

“ तो प्रश्न अलाहिदा आहे. पण मी मेघराजाला आज्ञा करतो. तो तुम्हा दोघांच्या राज्यांवर भरपूर पाऊस पाडील. तुमचे नदीनाले भरून जातील. पाण्याचा सुकाळ होईल.”

“ दोन राज्यांवर पाऊस पडणार अन् तो माझ्या राज्यावर का नाही?” उग्र पांड्य आसनावरून उठला आणि त्याने इंद्राला जाब विचारला.

“ ते तू तुझ्या उद्धटपणाला विचार. माझ्या दयेला तू पात्र नाहीस.” इंद्र कठोर शब्दांत बोलला.

“ देवेंद्रा! आगळीक तुझी आहे. मी काहीच केलं नाही. मी फक्त त्या महाभयंकर संकटाचा प्रतिकार केला. समुद्राला उधाण तू आणलंस. मी ते माझ्या सामर्थ्यावर शमवलं, एवढंच!”

“ ठीक आहे. मग तुझ्या सामर्थ्यावरच तू तुझ्या राज्यात पाऊस पाडून घे. माझ्याकडे भीक मागायला कशाला आलास?”

“ मी भीक मागायला आलो नाही. तुला जाब विचारायला आलो आहे. मी कदाचित् तुझा शत्रू असेन; पण माझ्या प्रजेने तुझं काहीच वाकडं केलं नाही. दर वर्षी ती तुझा उत्सव करते, तुला बलिदान करते आणि तुझा इंद्रध्वज फडकवते. अशा प्रजेला

तुझं हे बक्षीस ?"

"माझा निरुपाय आहे. तुझ्यामुळेच प्रजेची ही ससेहोलपट होते आहे. जबाबदार तू. करावं तसं भरावं."

"ठीक. हेच तुझं निर्वाणीचं उत्तर ना ?"

"होय, त्रिवार होय."

बैठक संपली. इंद्राने त्या दोघांची योग्य संभावना केली. त्यांना स्वर्गातला दिव्य रस पाजला. अनेक प्रकारचे नजराणे दिले. उग्र पांड्याने मात्र कशाचाच स्वीकार केला नाही. तिघेही स्वर्गातून एकदमच खाली आले. दोघांचे काम झाले होते. ते खुषीत होते. उग्र पांड्य तेवढा दाताखाली ओठ दावीत होता. इंद्राला कशा प्रकारे वठणीवर आणता येईल, या एकाच गोष्टीचा विचार त्याच्या मनात धुमसत राहिला होता.

पाऊसकाळ आला आणि चोल-चेर राज्यांवर मुसळधार पाऊस कोसळला. त्यांची राज्ये पाण्याने तुडुंब भरली. त्यांची प्रजा आनंदाने नाचली. शेतीभाती सुरू झाली. धान्याचे अंकुर तरारून उगवले.

पण उग्र पांड्याच्या राज्यात मात्र कसलाही बदल झाला नाही. शेजारची राज्ये आनंदाने बेहोष झाली आहेत अन् आपली प्रजा तेवढी मरणाला सामोरी जात आहे, हे दृश्य किती परस्परविरुद्ध होते! किती विसंगत होते!

पावसाचे काळेकुट्ट ढग उग्र पांड्याच्या राज्यावरून पलीकडच्या

राज्यात पळत होते; पण मदुरेच्या प्रदेशात एक थेंबही पाडीत नव्हते. ही घटना सहन होण्याजोगी नव्हती. उग्र पांड्याने मग ठरवले, की आता आपल्या 'शक्ती'चा, त्या अमोघ अस्त्राचा प्रयोग करायचा.

उग्रपांड्याने आचमन केले, मंत्र जपला आणि त्या शक्तीला मंत्राने भारले. लगेच तिला आज्ञा केली की 'सगळे काळे प्रचंड ढग आपल्या राज्यात खाली आण.'

शक्ती सुसाट निघाली. आकाशात झेपावताना तिने प्रचंड आवाज केला. त्या आवाजानेच ढेरपोटे ढग फुटले अन् भळा-भळा बरसू लागले. इतर सुरक्षित राहिलेल्या ढगांनी वरच्यावर पसार व्हायचे ठरवले. पण उग्र पांड्याच्या त्या शक्तीने त्या सर्वांना घेरले अन् चहूबाजूंनी आवळीत आणले. पाणी खाली लोटल्या-शिवाय आता त्यांना गत्यंतर नव्हते. अर्ध्या घटकेत सबंध मदुरेचे राज्य ओले चिंब झाले. ओढे-नाले असे काही खळाळले की विचारू नका.

ते शुभंकर दृश्य पाहून उग्र पांड्य अंतरात सुखावला, हर्षभरित झाला. मग त्याने आपली ती शक्ती परत खेचून घेतली.

इंद्र हा सगळा अघटित प्रकार वरून पाहात होता. त्याच्या अंगाची लाही लाही होत होती. मनोमन त्याला जाणवले, की एवढे अद्भुत ज्याने केले, तो उग्र पांड्य आणखी चार अश्वमेध पुरे करून शंभरी गाठील आणि त्या पुण्याईच्या बळावर स्वर्गाचे

राज्य माझ्या हातून हिसकावून घेईल. मला आपल्या दयेचा भिकारी बनवील. हे होता कामा नये. होऊ देता कामा नये. या उग्र पांड्याला आत्ताच जगातून नाहीसा केला पाहिजे.

इंद्राने हा विचार पक्का केला आणि तो आपले वज्र घेऊन खाली उतरला. मदुरेत येऊन त्याने उग्र पांड्याची गाठ घेतली.

" ढग ही माझी संपत्ती आहे. ती माझ्या मालकीची आहे. तू का म्हणून ढग तुझ्या राज्यावर फिरवलेस ? " त्याने उग्र पांड्याला दरडावून विचारले.

" माझ्या अंगी सामर्थ्य होते म्हणून मी ढग खाली आणले. देव पक्षपाती होतो, तेव्हा माझ्यासारख्या माणसाला देवांचीही खोड मोडावी लागते. "

" असं का ? मग घे माझा वज्रप्रहार. "

पण उग्र पांड्य सावध होता. त्याने इंद्राच्या हातातले वज्र पाहिले होते. वज्र म्हणजे महाभयंकर अस्त्र आहे, हेही त्याला ठाऊक होते. त्याच्याही हातात लोखंडी कडे होते अन् तेही तितक्याच ताकदीचे होते. इंद्राने वज्राचा हात उगारताच उग्र पांड्याने नेम धरून ते कडे फेकले. ते इंद्राच्या छातीवर आदळले. इंद्र मटकन खाली बसला. त्याला उठताच येईना. त्याचे सगळे शरीर जणू मातीचा गोळा बनले. उग्र पांड्य पुढे झाला. त्याने इंद्राला उठवले.

" समजला माझा प्रताप ? "

" समजलो. मी तुला शरण आहे. " इंद्र त्याला काकुळती येऊन म्हणाला.

" मग माझ्या देखत मेघराजाला आज्ञा कर. माझ्या राज्या-वर पाऊस पाडायला सांग. "

" सांगतो. " असे म्हणून इंद्राने मेघराजाला हाक दिली. त्यासरशी आकाशात गुड्डुम् असा गगनभेदी आवाज झाला. मेघ-राजाने इंद्राच्या हाकेला ती ओ दिली होती. ती ऐकल्यावर इंद्र त्याला म्हणाला.

" मेघराजा, उग्र पांड्याच्या राज्यावर भरपूर पाऊस पाड. त्याच्या राज्यात कधीही अवर्षण पडू देऊ नको. "

मग उग्र पांड्याने इंद्राला सन्मानाने देवलोकी पाठवले. राज्यात भरपूर पाऊस झाला. पण आता एक नवाच प्रश्न पुढे उभा राहिला. मागच्या दोन वर्षांत जे मोठे अवर्षण पडले, त्यामुळे राज्यातले सगळे शेतकरी मरायला टेकले होते. त्यांची औते मोडली होती. बैल मरून गेले होते. सगळी शेतजमीनच खराब होऊन गेली होती. आणि नावारूपाला आणून शेती पिकवण्याची ताकद शेत-कऱ्यांत उरलीच नव्हती. त्यासाठी आधी शेतकऱ्याला उभा करायला हवा होता. त्याच्या पोटात आधी कुठून तरी चार घास घालायला हवे होते. बैलजोडी, गुरेढोरे त्याच्या दावणीला आणून बांधायला हवी होती. आवते दुरुस्त करून द्यायला हवी होती. सगळ्याच बाजूंनी पुनर्वसन करायला हवे होते.

पण उग्र पांड्याच्या खजिन्यात द्रव्यच शिल्लक राहिले नव्हते.

जे होते ते त्याने गेल्या अवर्षणात प्रजेसाठी मुक्तहस्ताने वेचले होते. त्यामुळे आता काय करावे असा उग्रपांड्यापुढे प्रश्न पडला. काही दिवस तो बेचैन होता. सारखा विचार करीत होता. द्रव्य आणायचे कुठून ?

मग एक दिवस त्याला कळले, की मेरुपर्वतावर सोन्याची खाण आहे. पण मेरुपर्वत किती दूर ! त्याच्या पोटातली खाण तरी कशी शोधायची ? पण उग्र पांड्य हा कुठल्याही परिस्थितीत हातापायाची जुडी करून बसणारा नव्हता. त्याने साहस करायचे ठरवले. त्याच्यापाशी अशा कामाला उपयोगी पडणारे चेंडा नावाचे अस्त्र होते. ते त्याने सरसावले. आणि तो अबलख वारूवर बसून मेरुपर्वताकडे झेपावला. या प्रवासात त्याने स्वतःच्या जिवा-चीही तमा ठेवली नाही. अखेर तो मेरूच्या पायथ्याशी पोचला.

तिथे उभा राहून त्याने हात जोडले.

" हे पर्वतराजा, तुझी सोन्याची खाण तू माझ्यापुढे उघडी कर. मी तुझ्याकडे याचना करतो. माझ्यासाठी नव्हे; माझ्या प्रजेसाठी. मी तुझ्याकडून सोनं नेणार आहे. त्याचा कणन् कण प्रजेच्या पुनर्वसनासाठी लावणार आहे. तरी तू माझ्यावर दया कर."

पण मेरुपर्वताला दया आली नाही. त्याने कसलीच हालचाल केली नाही. राजाने विनव विनव विनवले. पण मेरूवरचा एक दगडही हालला नाही. राजा धरणे धरून बसला; पण तोही उपाय व्यर्थ गेला. मग मात्र उग्र पांड्याला राग आला. तो मेरूला म्हणाला.

" तूही इंद्राच्याच माळेचा मणी दिसतोस. शासन केल्या-वाचून तुझे डोळे उघडणार नाहीत. ठीक आहे; घे मग माझा अस्त्रप्रहार."

असे म्हणून उग्र पांड्याने आपल्या जवळचे चेंडा हे अस्त्र बाहेर काढले. ते मंत्राने भारले आणि पर्वतावर सोडून दिले.

त्या चेंडाच्या आघाताने मेरुपर्वतावर जो स्फोट झाला, तो अवर्णनीय होता. त्या स्फोटाने आजूबाजूच्या शंभर कोसांचा प्रदेश हादरून गेला. आणि काय आश्चर्य !

मेरुपर्वतावरची सोन्याची खाण एकदम उघडी झाली. सोन्याचे दगडच्या दगड खाली घरंगळू लागले. सूर्याच्या प्रका-शात ते सुवर्ण लखलख करू लागले. उग्रपांड्याचा मनोरथ सफल झाला. त्याने तिथल्याच लोकांना ते सुवर्ण गोळा करायला लावले आणि ते गोणीत भरून बैलांच्या पाठीवर चढवून घेतले. शेकडो बैलांचा सुवर्णभाराने वाकलेला काफिला मदुरेच्या दिशेने चालू लागला. यथाकाल मदुरेत पोचला. तिथल्या सर्व प्रजा-जनांनी तो देखावा डोळे भरून पाहिला.

राजाने ते हीणमिश्रित सुवर्ण शुद्ध केले. ते किमतीला चढवले. मग ते विकून द्रव्य जमा केले. ते द्रव्य शेतकऱ्यांना वाटले. अवर्षणाने ज्यांचे ज्यांचे जे जे नुकसान झाले होते, ते सर्व भरून काढले. मदुरेतल्या प्रजाजनांनी राजाचा एकमुखाने जयघोष केला.

" उग्र पांड्य राजा की जय."

# जनार्दन ‘पंडित’

एक ब्राह्मण होता. त्याला दोन मुलगे होते. थोरल्याचे नाव होते त्रिविक्रम अन् धाकट्याचे होते जनार्दन. त्यांपैकी त्रिविक्रम शिकला अन् पंडित झाला. धाकटा मात्र अनपढच राहिला. ब्राह्मणाच्या घरी राजाची चाकरी होती. ब्राह्मण रोज राजवाड्यात जाई आणि राजाला भागवतपुराण सांगे. त्या सेवेसाठी राजा ब्राह्मणाचा चरितार्थ चांगला चालेल, इतके धनधान्य त्या ब्राह्मणाला देई. ब्राह्मणाने त्या पैशातून घर बांधले होते आणि थोडी शेतीही विकत घेतली होती. ब्राह्मणाचे कुटुंब सुखाने नांदत होते.

कालांतराने ब्राह्मणाचा मृत्यू झाला. त्याचे दोन्ही मुलगे संपत्तीच्या वाटण्या करायला निघाले. त्रिविक्रम जनार्दनाला म्हणाला. “मी विद्वान आहे. तेव्हा राजाला पुराण सांगण्याची

वृत्ती मी घेईन. घरदार मलाच राहील. तू शेती संभाळ आणि तिच्यावर संसार चालव."

जनार्दनाने कसलीही खळखळ न करता ती वाटणी मान्य केली. तो घर सोडून शेतावर गेला. त्याने तिथे प्रथम झोपडी उठवली. तिथे राहून तो दिवसभर शेतात राबू लागला. तो भाजी-पाला लावी, धान्य पिकवी आणि पोटापुरते ठेवून बाकीचे सगळे विकून त्याचा पैसा करी.

होता होता जनार्दनाने नवे घर बांधले, बैल बारदाना घेतला. गायी पाळून दूध-दुभत्याचा सुकाळ केला. त्रिविक्रम राजाकडे पुराण सांगून आला की जनार्दनाच्या शेतावर जाई आणि सगळे पाही. जनार्दनाच्या घरी कशाचीच उणीव नाही हे त्रिविक्रमाने पाहिले. त्याला जनार्दनाचा हेवा वाटू लागला. त्याने निराळाच विचार सुरू केला. एके दिवशी तो जनार्दनाला म्हणाला,

"जनार्दन, आपण आता वाटण्या बदलू या. गावातले घर तू घे. तुझ्या या शेतावरच्या घरात मी राहीन. शेत मी करीन. राजाला भागवत-पुराण तू सांग."

"असं का? एकदा वाटण्या झाल्या त्या झाल्या. आता त्यात बदल नको." जनार्दन म्हणाला.

"त्याचं असं आहे, आपल्या वडिलांनी असं सांगितलं होतं की, आलटून पालटून संपत्ती भोगा."

"पण मला तर अक्षरओळखसुद्धा नाही. संस्कृत भाषेचा गंध

नाही. मी राजाला पुराण कसं सांगणार? राजा माझी फजिती करील. मला राज्यातून हाकलूनसुद्धा देईल."

"ते तुझं तू पहा!" त्रिविक्रम बोलला.

जनार्दनाला भांडायचे नव्हते. भावाभावांच्या भांडणाचा तमाशा लोकांना दाखवायचा नव्हता. तो शिकलासवरला नसला तरी अक्कलवान होता. त्याने भागवताची पोथी काखेत मारली अन् सरळ राजवाड्याचा रस्ता धरला.

राजाला तो पंडित नाही हे ठाऊक नव्हते. त्याने जनार्दनाला विचारले. "पंडितजी, आज तुम्हीसे आलात?" जनार्दन म्हणाला,

"दादा कंटाळला आहे. आजपासून मीच तुम्हांला पुराण सांगणार आहे."

"चालेल, चालेल! बसा त्या आसनावर."

जनार्दन त्या उच्चासनावर बसला. त्याने पोथी अर्धवट सोडली. तो अर्धवट उच्चारात मंगलाचरण गुणगुणला. त्याने आपली मुद्रा गंभीर केली. क्षणभर ध्यानस्थ बसल्यासारखे दाखवले. मग तो राजाला म्हणाला.

"महाराज, तुम्ही भागवत पुराण साद्यंत ऐकणार आहां का त्याचं सार ऐकणार आहां?"

राजाने विचार केला. सगळी लांबण ऐकत बसण्यापेक्षा सार काय तेवढेच ऐकावे. उगाच जास्त वेळ कशाला घालवायचा? म्हणून तो जनार्दनाला म्हणाला. "तुम्ही सार तेवढेच सांगा."

जनार्दन म्हणाला, " महाराज, ऐका तर मग. आजच्या पुराणाचं सार आहे– " करावे तसे भरावे ! "



राजाला ते पटले. तो म्हणाला, " ठीक ठीक ! करावे तसे भरावे. फार छान ! "

जनार्दनाने पोथी गुंडाळली. राजाने खूष होऊन त्याच्या हातावर एक सोन्याची मोहर ठेवली. जनार्दनाची कमाई चांगली झाली. तो प्रसन्न मनाने राजवाड्याच्या बाहेर पडला.

थोडा पुढे जातो, तो जनार्दनाला राजाचा न्हावी भेटला. तो धूर्तपणाचा अर्क होता. जनार्दनाला पोथी खाकेला मारून येताना त्याने पाहिले.

" आँ ? आज तुम्ही पुराण सांगायला ? "

" हो, मी ! तुला एवढं आश्चर्य काय वाटलं ? ही बघ राजाने मला सोन्याची मोहर बिदागी म्हणून दिली."

न्हाव्याला ती मोहर पाहून जनार्दनाचा मत्सर वाटला. मी एवढी हलक्या हाताने हजामत करतो, डोक्याला मालिश करतो, तासतासभर अंग रगडतो, तरी राजा फक्त एक चांदीचे नाणे माझ्या अंगावर फेकतो. अन् या पुराणिकाला सोन्याची मोहर !... बस ! याला यापुढे राजवाड्याचा दरवाजा बंदच करून टाकतो. मग तो हलक्या आवाजात जनार्दनाला बोलला.

" पंडितमहाराज ! तुम्ही त्या राजाच्या तोंडाशी तोंड नेऊन पुराण सांगितलंत ? अहो, राजा मांस खातो, मच्छर खातो, दारू पितो, शीः ! तुम्ही बाटाल अशानं ! "

" खरं म्हणतोस ? "

" तर काय ! उद्यापासून नाकातोंडावर पट्टी बांधून पुराण सांगायला बसत चला. "

" असं म्हणतोस ? हे मला ठाऊक नव्हतं. उद्यापासून तू सांगतोस तसं करीन."

मग दोघे दोन वाटांनी निघून गेले. न्हावी राजवाड्यात आला. हजामत करता करता राजाला म्हणाला,

" महाराज ! शास्त्रीबुवा पुराण सांगून गेला ना ? मला भेटला वाटेत. म्हणाला– राजाच्या तोंडाला फार घाण येते. उद्यापासून मी आपला नाकातोंडावर पट्टी बांधूनच पुराण सांगेन."

" असं म्हणाला ? ठीक आहे. मी बघतो त्याच्याकडे."

दुसऱ्या दिवशी खरेच जनार्दन पट्टी बांधून आला. राजाला त्याचा राग आला पण तो त्याने बोलून दाखवला नाही. त्याने निराळ्याच प्रकाराने जनार्दनाला शिक्षा करायचे ठरवले.

राजा पुराण ऐकायला बसला. जनार्दनाने राजाला म्हटले,

" महाराज, आजच्या पुराणाचं तुम्हांला सार सांगतो– माणूस दुसऱ्यासाठी खड्डा खणतो, पण तोच त्यात पडतो ! "

राजा म्हणाला, ' ठीक आहे ! '

आणि त्याने जनार्दनाला त्या दिवशी सोन्याच्या दोन मोहरा दिल्या. जनार्दन खरे म्हणजे त्या दोन मोहरा पाहून खूष व्हायचा पण तसा तो झाला नाही. यात काही तरी कपट आहे हे त्याने ओळखले. तो त्या मोहरा घेऊन जायला निघताच राजाने त्याच्या हातात एक मोहोरबंद लखोटा ठेवला. तो जनार्दनाला म्हणाला.

" पंडितमहाराज, जाता जाता एवढा लखोटा कोतवालीत नेऊन द्या अन् पुढे चला."

जनार्दनाने तो लखोटा घेतला आणि तो राजवाड्याबाहेर पडला. गल्लीच्या तोंडावर न्हावी त्याची वाटच पाहात होता. जनार्दनाला पाहून तो पुढे आला.

" काय शास्त्रीबुवा ! आज कसं काय झालं पुराण ? "

जनार्दनाला न्हाव्याच्या कर्तुकीची जाणीव झाली होती. त्याने त्या न्हाव्याला धडा शिकवायचे ठरविले होते. तो साळसूदपणे न्हाव्याला म्हणाला.

" पुराण ना ? फारच छान झालं. राजाला फार आवडलं. त्याने मला एकीच्या जागी आज दोन सोन्याच्या मोहरा दिल्या. या बघ !"

त्या पिवळ्या धमक सुवर्णमुद्रा पाहून न्हाव्याच्या तोंडाला पाणी सुटले. तो म्हणाला.

" शास्त्रीबुवा, त्यातली एक मोहोर मला द्या. काल हजामत करायला गेलो होतो, तेव्हा राजाकडे मीच तुमची शिफारस केली होती."

" असं का ? मग तुझे उपकार आहेत. घे ही एक मोहर."

न्हाव्याने ती आशाळभूतपणे घेतली अन् कनवटीला लावली. ते पाहून जनार्दन त्याला म्हणाला.

"आता माझं एक काम कर. हा राजाचा लखोटा तेवढा कोतवालीत नेऊन दे. मला जरा घाई आहे म्हणून तुला सांगतो."

"द्या की राव ! आम्ही कधी तुम्हांला नाही म्हटलं आहे ? उद्या पुराणाची एक मोहोर तेवढी मला द्या म्हणजे झालं."

"जरूर देईन." जनार्दनाने म्हटले अन् तो सटकला.

न्हावी कोतवालीकडे जाताना विचार करू लागला. 'आजची ही मोहोर विकून पोटभर मिठाई खायची. उरतील त्या पैशांचं सामान खरेदी करायचं. बायकोची भुणभुण नको.' या आणि अशाच विचारात चालत चालत न्हावी कोतवालीत पोचला. मुजरा करून त्याने तो लखोटा कोतवालाच्या हाती दिला. कोतवालाने तो उघडून वाचला. त्यात लिहिले होते—

"हा लखोटा घेऊन येईल त्याचं नाक कापा आणि त्याला हाकलून द्या."

कोतवालाने इशारा करताच दोन शिपायांनी दोन्ही बाजूंनी न्हाव्याचे हात पकडले. कोतवाल म्हणाला, "न्हावी मोठा बेरकी दिसतो. काही तरी याने लांडीलबाडी केली असली पाहिजे. बरी शिक्षा दिली राजाने."

असे म्हणून कोतवाल पुढे झाला. त्याने न्हाव्याच्याच धोपटीतला वस्तरा घेतला अन् खस्दिशी न्हाव्याचे नाक कापले. ही रक्ताची धार लागली. कोतवालाने लगेच त्याच्या ढुंगणावर लाथ मारली अन् त्याला घालवून दिले.

दुसऱ्या दिवशी आपला जनार्दन भागवताची पोथी खाकेला मारून राजापुढे उभा !

राजाच्या मुखातून आश्चर्योद्गार बाहेर पडले.

" आँ : असं कसं झालं ? "

त्यावर जनार्दन म्हणाला.

" महाराज, कालच्या पुराणाचं मी तुम्हाला सार सांगितलं होतं. ' जो दुसऱ्यासाठी खड्डा खणतो, त्यात तो स्वतःच पडतो ! ' आठवतं ना ? "

" आठवतं आठवतं ! ही सारी त्या न्हाव्याची चहाडगिरी ! काय झालं त्याचं ? "

" दुसरं काय व्हायचं ? कापलेलं नाक घेऊन कुठे तरी हिंडत असेल ! "

" हिंडू दे, हिंडू दे. तो तसलाच होता. त्याच्या कर्माचंच त्याला प्रायश्चित्त मिळालं. शास्त्रीबुवा ! आजपासून तुम्हांला रोज दोन मोहरा. तुम्ही आमच्या सहवासात जास्तीत जास्त वेळ राहायचं. तुमच्या शहाणपणाचा मला उपयोग होईल. "

जनार्दन पंडित म्हणाला– " जशी महाराजांची आज्ञा ! "

# निर्धार वचन

मारवाडमधल्या जोधपूरचा राजा. त्याचे नाव विजयसिंह. पोकरणाचा ठाकूर देवीसिंह. दोघे एका काळचे परम मित्र. पण देवीसिंह आपल्या विरुद्ध कारस्थाने करतो अशी विजयसिंहाला उगीच शंका आली आणि मैत्रीच्या दुधात मिठाचा खडा पडला. विजयसिंहाने ठरवले, की देवीसिंहाला मारून टाकायचे. पण ती गोष्ट सरळ मार्गाने शक्य नव्हती. कारण देवीसिंह पराक्रमी होता आणि त्याचे मुलगे सबलसिंह आणि श्यामसिंह बापसे बेटे सवाई होते. त्यांच्यापुढे विजयसिंहाचा टिकाव लागला नसता.

म्हणून विजयसिंहाने कपट करायचे ठरवले. त्याने एक समारंभ योजला आणि त्यासाठी देवीसिंहाला आग्रहाचे बोलावणे पाठवले. देवीसिंह मनात खूष झाला. त्याला वाटले, की चार दिवस जोध-

पूरला जाऊ, खाऊ पिऊ आणि मित्रशी खूप गप्पागोष्टी करू.

देवीसिंह बोलावल्या दिवशी जोधपूरला आला. विजयसिंहाने पहिल्या भेटीत त्याला कडकडून मिठी मारली आणि त्याचे दिलखुलास स्वागत केले. ‘ मित्रा, तू आलास; मला खूप खूप आनंद झाला. मित्र घरी येणं, याच्यासारखं भाग्य नाही.’

दिवस मोठ्या खुषीत गेला. रात्रीची मेजवानी उरकली. मग विजयसिंह देवीसिंहाला घेऊन एका मोठ्या खोलीत गेला. तिथे छप्पर पलंग होता, त्यावर गाद्यागिरद्या होत्या, फुले होती, समया तेवत होत्या. पाण्याची सुरई भरलेली होती आणि हुक्काही होता. सर्व सरंजाम कसा राजेशाही होता. विजयसिंह देवीसिंहाला पलंगावर बसवून म्हणाला.

“ तू आता स्वस्थ झोप. मला झोप आली नाही, तर मी तुला येऊन उठवीन. मग आपण गच्चीवरच्या चांदण्यात गप्पा मारू. दाराला आतून अडसर घालू नको.”

देवीसिंह म्हणाला, “ ठीक आहे. ” मग तो पलंगावर आडवा झाला. घटकाभरात त्याचे डोळे मिटले. तो झोपला, गाढ झोपला. भावी संकटाची त्याला पुसटशीसुद्धा कल्पना नव्हती.

मध्यरात्र उलटल्यावर विजयसिंह दबत्या पावलांनी देवी-सिंहाच्या खोलीकडे आला. हळूच आत शिरला. त्याच्या हातात टोकदार कट्यार होती. त्याने पलंगाजवळ उभे राहून कानोसा घेतला. देवीसिंह घोरत होता.




विजयसिंहाने लगेच पवित्रा घेतला. कट्यारीचा हात उंच केला आणि जोराने खाली आणला. कट्यार देवीसिंहाच्या काळ-

जात खोलवर घुसली. देवीसिंहाने एकदाच फक्त 'आई ग' म्हटले आणि तो निजल्या जागी शांत झाला. त्याच्याभोवती रक्ताचे थारोळे जमले. हे निर्दय पापकृत्य करताना, मित्राचा असा विश्वासघात करतांना विजयसिंह क्षणभरदेखील कचरला नाही. देवीसिंहाचे शरीर गार पडलेले पाहिल्यावर त्याने दात ओठ खात म्हटले. 'माझ्याविरुद्ध कारस्थानं करीत होतास नाही? जा आता यमाच्या दरबारी. पड नरकात!'

दुसरा दिवस उजाडला. विजयसिंहाने देवीसिंहाच्या प्रेताची विल्हेवाट लावली. मग त्याने ठरवले की, याच झटक्यात देवी-सिंहाच्या दोन्ही पोरांना मारून टाकायचे. बापाच्या मृत्यूची वार्ता कळायच्या आत त्यांच्यावर हल्ला करावयचा. विजयसिंहाने विश्वासघात करून आपल्या बापाला ठार केले असे समजले, तर ते दोघे वाघासारखे आपल्यावर तुटून पडतील. मग माझी धड-गत राहणार नाही.

सबलसिंह आणि श्यामसिंह हे दोघे देवीसिंहाचे पुत्र आपापल्या कामात गढून होते, बेसावध होते. आणि एवढ्यात विजयसिंहाचे हजार सैनिक त्यांच्या गढीवर चालून आले. हा काही तरी दगा फटका आहे, हे त्या दोघांना समजले.

गढीत होती नव्हती तेवढी शिबंदी एकत्र करून सबलसिंह प्रतिकाराला उभा झाला. त्याच्या जोडीला त्याचा धाकटा भाऊ श्यामसिंहही रणधाईत उतरला. दोन्ही सैन्यांत आक्रोश उसळला. इकडचे अन् तिकडचे सैनिक घाव लागून मातीत लोळू लागले.

कित्येक मेले, कित्येक अर्धमेले झाले. मेले त्यांचा आवाज थांबला. अर्धमेले रक्ताच्या थारोळ्यात लोळता लोळता रडू कण्हू लागले. लढणाऱ्या सैनिकांना कोण मेले, कोण पडले याची फिकीर करायला वेळ नव्हता. देमार किंवा घेमार एवढीच त्यांना जाणीव होती.

होता होता सबलसिंहाचे सैन्य कमी कमी होऊ लागले. सबलसिंह उघडा पडला. तेवढ्यात त्याला शत्रूचा दणका बसला. नेमकी कपाळावर गोळी लागली. सबलसिंह खाली कोसळला. आपण आता थोड्याच काळाचे सोबती आहो हे त्याला पुरते जाणवले. त्याने धाकट्या भावाला जवळ बोलावले. त्याच्या ओंजळीत पाणी दिले अन् त्याला म्हटले.

" श्यामसिंह, शपथ घे— मी जिवात जीव असेपर्यंत जोधपूर राज्यात पाणी पिणार नाही. "

श्यामसिंहाला या शपथेचा अर्थच कळेना. त्याला वाटले होते की सबलसिंह वेगळे काही सांगेल. ' तू बापाच्या अन् माझ्या मृत्यूचा सूड घे, तोवर स्वस्थ बसू नको.' पण ही शपथ अगदी वेगळी होती. जोधपूर राज्यात पाणी प्यायचे नाही म्हणजे श्यामसिंहाने त्या राज्यात राहायचे नाही. आयुष्यभरासाठी जन्मभूमीचा त्याग करायचा.

सबलसिंहाला तेच हवे होते. त्याला श्यामसिंहाबद्दल विश्वास नव्हता. आपल्या मागून श्यामसिंह गढी बळकावील आणि आपल्या दोन मुलांना देशोधडीला लावील असे त्याला वाटत

...२...

होते. आणि म्हणूनच तो श्यामसिंहाकडून अशी शपथ घेवविणार होता. श्यामसिंहाने त्याच्या मनातला हा आदेश ओळखला. पण मरतेसमयी भावाच्या आत्म्याची तगमग शांत व्हावी म्हणून त्याने सबलसिंहाला हवी तशी शपथ घेतली—

" मी जिवात जीव असेपर्यंत जोधपूर राज्यात पाणी पिणार नाही ! "

आणि दुसऱ्याच क्षणी श्यामसिंह गढी उतरला. सरळ भरतपूरला आला. तिथे जाटांचे राज्य होते. राजाचे नाव जवाहरमल होते. श्यामसिंह त्याला भेटला. त्याने सेवा करण्याची इच्छा प्रदर्शित केली. जवाहरमलने श्यामसिंहाला निरखून पारखून घेतले. श्यामसिंह त्याला पटला. त्याने त्याला नोकरीत ठेवून घेतले. त्याला पाचशे सैनिकांवरचा सरदार बनवले. श्यामसिंहाचा तिथे छान जम बसला.

काही कालाने तिथे एक नवी घटना घडली. जोधपूरचा विजयसिंह कोणत्या तरी यात्रेला निघाला होता. त्याला वाटेत भरतपूर लागले. शहर एकदा डोळ्याखालून घालावे, म्हणून त्याने तिथे चार दिवस मुक्काम केला. त्याच्या तळावर काम करायला येणारी एक जाट स्त्री तरुण आणि अतिदेखणी होती. तिचे नाव होते गुलाब. विजयसिंहाला तिचा मोह पडला. त्याने एक दिवस तिला एकांती बोलावून म्हटले.

" गुलाब, तू माझ्याबरोबर जोधपूरला चल. मी तुला अंतःपुराची प्रमुख परिचारिका बनवीन. इथे कष्टाची कामं करतेस.

गरिबीत दिवस काढतेस. माझ्याकडे आलीस तर तुझं दैन्य फिटेल. तुला मी दागदागिने बनवीन. रेशमी वस्त्रं देईन. मी खातो जेवतो तेच तुला देईन. बघ आहे कबूल ? ”

गुलाबला विजयसिंहाचे बोलणे मोहक वाटले. राजाला काय हवे, त्याचा अर्थ तिला कळला. भावी सुखाची गोड स्वप्ने क्षणभर तिच्यापुढे तरळली. ती खालच्या मानेने पदराशी चाळा करू लागली. विजयसिंहही जे काय समजायचे ते समजला. त्याने गुलाबला आपल्या तळावरून परत पाठवलेच नाही. मुक्काम हालवून गुलाबसह तो जोधपूरला आला.

तिथे गुलाबचे भाग्य एकदम फळफळले. ती दासी म्हणून आली ती राणी होऊन बसली. ती मोठी पाताळयंत्री होती. काही काळ शहाणपणाने अन् कावेबाजपणे वागून तिने हळूहळू विजयसिंहाला आपल्या कबजात घेतले. गुलाबने बोलावे अन् राजाने झेलावे. सगळ्या भांडाराच्या किल्ल्या राजाने तिच्या हाती सुपूर्त केल्या. जोधपूरच्या राजकारणातही ती नाक खुपसू लागली. कोणाला नेमायचे आणि कोणाला काढायचे हे तिच्या इच्छेवर ठरू लागले. विजयसिंहाची पट्टराणी तिच्यापुढे हतबल ठरली, बिचारी झाली. राजा आपल्या कारभाराचे निर्णय स्वतंत्रपणे घ्यायला असमर्थ ठरला. कसलाही निर्णय गुलाबने हो म्हटल्याशिवाय पुढे जाईना. त्या राजवाड्यात आणि राज्यातसुद्धा तिने आपला रुबाब एवढा वाढवून घेतला, की सगळे लोक अन् सगळे अधिकारी राजापेक्षाही तिलाच अधिक घाबरून राहू लागले.

गुलाबची महत्त्वाकांक्षा आता आणखी वाढली. ती मनात म्हणाली. 'आपण भरतपुरात राहत होतो; पण किती दैन्यावस्थेत! कोणी विचारीत नव्हतं आपल्याला! पण आज दैव पालटलं आहे. या जोधपुरात माझ्याकडे भुवई उंचावून बघण्याची सुद्धा कोणाची छाती नाही. लोकांची सोडाच; पण राजाची सुद्धा नाही.... तेव्हा आता आपण आपली ही श्रीमंती, आपली ही सत्ता भरतपूरच्या लोकांना एकदा दाखवावी. त्यांचे डोळे दिपवून सोडावे...!'

आणि गुलाबने भरतपूरच्या प्रवासाचा बेत ठरवला. सगळा राजेशाही थाट अन् सरंजाम घेऊन ती निघाली. भरतपूरच्या वेशीत पोचली. एका प्रशस्त जागी तिने डेरे राहुट्या दिल्या. तिथून भरतपूरच्या राजाला निरोप पाठवला. 'जोधपूरची राणी तुमच्या शहरात दाखल झाली आहे. तिला तुम्ही भेटायला या.'

एका हलक्या सलक्या स्त्रीने केवळ जोधपूरच्या राजाची आवडती म्हणून एवढा मर्यादातिक्रम करावा, आपल्याला भेटीस बोलवावे, या गोष्टीचा भरतपूरचा राजा जवाहरमल याला भलताच संताप आला. त्याने गुलाबला धडा शिकवायचे ठरवले. लगेच श्यामसिंहाला निरोप धाडला. तो येऊन राजासमोर उभा झाला.

"श्यामसिंह! जोधपूरचा राजा तुझा शत्रू आहे. त्याने तुझा बाप अन् भाऊ या दोघांनाही ठार केले आहे. ते वैर तुझ्या मनात

धुमसत असेलच. आज त्याचा सूड घेण्याची संधी चालून आली आहे. ”

“ ती कशी काय महाराज ? ”

“ राजाची रखेली गुलाब आज भरतपुरात आली आहे. त्या उन्मत्त बाईने मला भेटायला बोलावण्याचं धाडस केलं. तिला शासन झालंच पाहिजे. तू आज मध्यरात्री तुझ्या हाताखालच्या सैनिकांसह तिच्या डेऱ्यावर धाड घाल आणि तिला पकडून माझ्यापुढे आण.”

श्यामसिंहाने तो हुकूम ऐकला. पण त्याने एकदम ‘ आज्ञा महाराज ’ म्हटले नाही. त्याचे मत वेगळ्याच प्रकारे विचार करू लागले. ‘ जोधपूरचा राजा माझा वैरी. तो पुढे आला तर मी त्याला माझ्या तरवारीचे पाणी जरूर दाखवीन. पण या बाईने माझं काय वाकडं केलं आहे ! बोलून चालून बाई. असेल अचरट. असेल उन्मत्त. म्हणून काय मी तिच्यावर धाड घालावी ! अन् तीही मध्यरात्री ! हा राजा माझ्याकडून तिला पकडून आणणार ! अन् मग तिची अब्रू लुटणार ! छेः ! हे मी नाही घडू देणार ! यात मला भूषण नाही....’

श्यामसिंह मुकाट्याने तिथून निघाला. तीन्हीसांजा त्याने जाटाचा वेष घेतला. कारण गुलाब जाटीण होती. तो गुलाबची भेट घ्यायला निघाला. कोणताही अडथळा न येता तिच्या डेऱ्यात पोचला. ती प्रथम चमकली. मग म्हणाली.

" तू कोण ? "

" मी तुझा हितकर्ता. अनोळखी पण विश्वासू ! "

" नाव काय तुझं ? "

" माझ्या नावाशी तुला काहीच कर्तव्य नाही. कर्तव्य आहे मी काय सांगतो त्याच्याशी."

" काय सांगणार आहेस ? "

" आज मध्यरात्री तुला धोका आहे. भरतपूरच्या राजाला तुझा उर्मटपणा आवडला नाही. तू त्याला भेटीला बोलावलंस ही फार वाईट गोष्ट केलीस. मर्यादेचं उल्लंघन केलंस. त्याचं प्रायश्चित्त आज रात्रौ तो तुला देणार आहे. तुला पकडून नेणार आहे. तुझी अब्रू घेणार आहे. हे व्हायला नको असेल तर तू मुकाट्याने रात्र होताच तुझ्या फौजफाट्यासह इथून निघून जा. भरतपूरच्या राज्याबाहेर पोचशील तेव्हाच तू सुरक्षित राहशील ! "

गुलाब ते ऐकून अस्वस्थ झाली. अब्रू जाण्याचा प्रसंग म्हणजे त्यापेक्षा मरण बरे ! तिच्या पायाखालची वाळूच सरकली. भयकंपित मनाने रात्र केव्हा होते, याची ती वाट बघत राहिली. प्रहररात्री अंधाराचा फायदा घेऊन तिने आपला रथ जोडला. सगळी बांधाबांध उरकली. आणि फौजफाट्यासह हलक्या पावलांनी पलायन केले.

मध्यरात्र झाली तरी श्यामसिंहाने गुलाबला पकडून आणले नाही म्हणून राजा जवाहरमल अस्वस्थ झाला. महालात फेऱ्या

घालू लागला. खुट्ट वाजले की कानोसा घेऊ लागला. पण काही दिसेना, की काही ऐकू येईना. गुलाबला केव्हा एकदा नष्टभ्रष्ट करतो, असे त्याला होऊन गेले होते.

होता होता रात्रीचा तिसरा प्रहर उलटला. काहीही घडले नाही. गुलाबची काळी छायासुद्धा त्याला दिसली नाही. मग त्याची खात्री झाली, की श्यामसिंहाने आपल्याला दगा दिला. तो रागाने थरथरला. बाहेर आला. त्याने सेनापतीला बोलावून आणले. तो हात जोडून पुढे आला.

" तावडतोब पाचशे सैनिक घेऊन जा अन् त्या रांडेला पकडून आणा. "

सेनापती सैन्य घेऊन गेला. पण पकडायला गुलाबच्या तळा-वर होतेच कोण ? सगळे सामसूम. अंधाराचे राज्य. सेनापती म्यानातली तलवार न उपसताच परत आला. खालच्या मानेने राजापुढे उभा राहिला. त्याने तोंड न उघडताच राजाला कल्पना आली. तो बोलला.

" सगळं सैन्य घेऊन असेच्या असे तिचा पाठलाग करा. बुचडा धरून तिला फरफटत ओढीत आणा. चला, निघा..."

सेनापती पाठलागावर गेला. पण गुलाबच्या आधी त्याची श्यामसिंहाशी गाठ पडली. त्याला ही अटकळ होती आणि म्हणून तो जयपूरच्या रस्त्यावर सैनिकांसह दबा धरून बसला होता. श्यामसिंहाचे ते सैनिक भरतपूरच्या सैन्यावर असे काही

तुटून पडले, की विचारू नका. पाठलागवाल्यांना पळता भुई थोडी झाली.

एवढे करून श्यामसिंह त्या सैनिकांसह जयपूरच्या हद्दीत सुखरूप पोचला. त्याच्या आधी गुलाब तिथे पोचली होती. त्या दोघांना आता तिथे अभय होते. जवाहरमल त्या राज्यात आपले सैनिक घुसवू शकणार नव्हता.

श्यामसिंह गुलाबला जयपूर येथे भेटला. तिने त्याचे चक्क पाय धरले. तू होतास म्हणून आज मी अब्रूनिशी बचावले, असे डोळ्यात अश्रू आणून म्हटले. ती पुढे म्हणाली.

"तू आता माझ्याबरोबर जोधपूरला चल. तुझ्या या उपकारांनी विजयसिंहराजा भारावून जाईल. तुला तू मागशील ते बक्षीस देईल."

"गुलाबदेवी, मी बक्षिसाचा लालची नाही. मी तुला संरक्षण दिलं ते कर्तव्य म्हणून दिलं. कोणत्याही वीर पुरुषाला स्त्रीची विटंबना कधीही सहन होत नसते. तो अशा वेळी तुटून पडतो. विजयी होतो किंवा मरून जातो."

"म्हणूनच असा वीर पुरुष जोधपूरच्या राज्याला हवा. तुला किरकोळ बक्षीस नको असलं, तर मी तुला राजाकडून अर्धे राज्य देववीन!"

"बाई, तुमचं राज्य तुम्हांला लखलाभ होवो. मी तर जोधपूरच्या राज्यात पाणी पिणार नाही अशी शपथ घेतली आहे. तू

सुखेनैव जोधपूरला जा. मात्र एक लक्षात ठेव. पुन्हा असला अतिप्रसंगकरू नको.”

असे बोलून तो वीरपुंगव झटक्यात मागे फिरला आणि बाहेरच्या काळ्याकुट्ट अंधारात अदृश्य झाला.

म. वं. मं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २८४२ दिनांक ९।८।८३
विषय ओ. वी. क्र. ......

# देवाहून भक्त श्रेष्ठ

नारदमुनी हा महान भक्तश्रेष्ठ. त्याच्या खांद्यावर सदैव तंबोरी असे. त्या तंबोरीच्या सुरावर तो अखंड देवाचे भजन करी. श्रीविष्णूची सुंदर सुंदर स्तोत्रे म्हणे. मध्येच 'नारायण, नारायण' असा नामगजर करी.

नारदाला एका ठिकाणी स्थिर राहणे कधीच आवडत नसे. तो सदैव फिरता राही. त्रिभुवनात त्याचा संचार असे. आज मृत्युलोकी तर उद्या पाताळात. कधी स्वर्गात तर कधी विष्णुलोकात. त्याला कुठेही मज्जाव नसायचा. तो जिथे जाईल तिथल्या लोकांना त्रिभुवनातले वर्तमान समजायचे. त्याच्या संगतीत देव, दैत्य, मानव या सर्वांचा वेळ मजेत जायचा.

नारदाचे आगमन सर्वांना प्रिय व्हायचे. जिथे जाईल तिथे 'या

नारदमुने ' असे त्याचे हर्षभरित स्वागत व्हायचे.

त्या दिवशी मृत्युलोकात तो एका शेटजीकडे गेला, तेव्हा तिथेही त्याचे सहर्ष स्वागत झाले. शेटजी धावत पुढे आला आणि त्याने नारदाचे पाय धरले. उच्चासनावर बसवून त्याने नारदाची पूजा केली. फुले वाहिली, फळे दिली, अन् नैवेद्यही समर्पिला. नारदमुनी खूष झाला. एवढ्यात शेटजीच्या बायकोनेही पुढे येऊन नारदाच्या पायावर डोके ठेवले.

नारदाने शेठ अन् शेठाणी या दोघांच्याही मुखाकडे पाहिले. ती दोघे त्याला कष्टी अन् उदास दिसली. त्यांच्या हसण्यात जीव नव्हता अन् बोलण्यात मोकळेपणा नव्हता. नारद मनात म्हणाला, एवढा मोठा वाडा आहे, त्यात ठायी ठायी संपत्तीचा वास आहे, दारात गाडी-घोडा आहे, गोठ्यात दुभत्या गायी म्हशी आहेत, दागदागिन्यांची रेलचेल आहे, मग हे जोडपे असे उदास का? काय कमी आहे यांच्या संसारात? नारदाला राहवेना. त्याने सरळच प्रश्न केला.

" शेठजी, तुमच्या उदासीनतेचे कारण काय ते सांगाल काय ? "

" नारदमुने, आम्हांला कशाचीच वाण नाही. देवदयेने अन् तुमच्या आशीर्वादाने पेढी चांगली चालली आहे. पैसा भरपूर घरात येतो. पण आमच्यामागून या दौलतीला कोणी धनी नाही. आम्हांला मूलच झाले नाही. अन् आता या वाढत्या

वयात होण्याची आशाही नाही. म्हणून आम्ही उभयता उदासपणे दिवस कंठीत आहो."

नारदाच्या मनाला ती गोष्ट लागली. एवढा धार्मिक अन् दानशूर शेठजी अन् त्याला पुत्रसंतान नाही म्हणजे हा देवाघरचा अन्याय आहे. तो शेठजीला म्हणाला.

" सावकार, असा निराश होऊ नको. मी आता सरळ वैकुंठात जाईन अन् श्रीविष्णूला सांगून तुला पुत्र देववीन. "

" तसं झालं तर नारदमुने, आम्ही आमच्या कातडीचे जोडे करून तुमच्या पायात घालू."

नारद तिथून उठला. 'नारायण' म्हणून वाड्यातून बाहेर पडला. दुसऱ्याच क्षणी त्याने गरुडासारखी गगनमंडलात झेप घेतली. सरळ वैकुंठ गाठला. श्रीविष्णूच्या राजवाड्यापुढे उभा राहून त्याने 'नाराऽऽयण !' अशी गर्जना केली. वैकुंठपती समजला, की नारदाची स्वारी आली. तो लगबगीने नारदाच्या दर्शनार्थ महाद्वारात आला. नारदाला हाती धरून त्याने त्याला उच्चासनाकडे नेले. 'मुने, बसावं !' असे त्याला म्हटले.

" मी बसायला आलो नाही. मी अन्यायाची दाद मागायला आलो आहे. मृत्युलोकीच्या त्या शेठजीला मुलगा का नाही ? तो धार्मिक आहे, पुण्यशील आहे, उदार आहे. त्याला मुलगा झालाच पाहिजे. आणि वैकुंठपते, तो मुलगा तू त्याला दिला पाहिजेस. नाही तर मी पृथ्वीवर जाऊन सर्व लोकांना ओरडून

सांगेन की ' तुम्ही विष्णूची भक्ती करू नका ! '

विष्णू विचारात पडला. त्याने अंतर्ज्ञानाने शेटजी कोण ते जाणले. त्याला मूल का नाही हेही जाणले. तो नारदाला म्हणाला,

" नारदा, तुझा हा दुराग्रह व्यर्थ आहे. त्या शेठजीला मूल होणारच नाही. कारण ते त्याच्या नशिबातच नाही. त्याचं पूर्व-कर्म संतती होण्याला प्रतिकूल आहे. "

" देवा, हे तुम्ही मला सांगता ? तुम्ही सर्वश्रेष्ठ देव ! कर्तुम् अकर्तुम् समर्थ ! तुम्ही त्याचं नशीब बदला. "

" तेवढंच मला शक्य नाही. ते काम ब्रह्मदेवाचं. ब्रह्मदेव प्रत्येक प्राण्याचं नशीब त्याच्या भालप्रदेशावर लिहून ठेवतो. तो लेख पुसता येणार नाही. तू ब्रह्मदेवाकडे जाऊन त्याला गळ घाल. "

नारदाचा निरुपाय झाला. त्याने वेळ न दवडता ब्रह्मलोकी प्रयाण केले. ब्रह्मदेव तर नारदाचा बापच होता. मुलाची इच्छा आकांक्षा त्याने आनंदाने पूर्ण केली असती. पण ब्रह्मदेवाचाही निरुपाय होता. शेटजीच्या कपाळीचा लेख तोही पुसू शकत नव्हता. त्याने नारदाला सांगितले.

" मुला, माझा निरुपाय आहे. मी तो लेख बदलू शकत नाही. त्या शेठजीला पुत्रावाचूनच जगणं अन् मरणं भाग आहे. वाटल्यास पुढच्या जन्मी मी त्याच्या कपाळी पुत्रसुख लिहीन. "

नारदाचा निरुपाय झाला. त्याला वाईटही वाटले. त्याने आपल्यापरी सगळे प्रयत्न केले होते आणि आता त्याच्या हाती काहीही नव्हते. नारदाने मग तो विषय डोक्यातून काढून टाकला अन् तो आपल्या कामाला लागला.

अशी सात आठ वर्षे गेली. नारदाला का कोण जाणे; त्या शेठजीचे पुन्हा एकदा स्मरण झाले त्याला वाटले, जावे एकदा त्याच्या घरी अन् बघावी त्याची हालचाल. आणि मग तो त्याच्या दारी खडा झाला.

पाहतो, तर शेठजीचे घर हर्षाने फुललेले अन् आनंदाने ओसंडलेले. शेठजीने त्याला प्रेमपूर्वक घरात नेले अन् शेठाणीला हाक मारली. ती तेजाने रसरशीत दिसणारी बाई पुढे आली. दोघांनी मिळून नारदाच्या चरणांचा स्पर्श केला. नारद सुखासनावर बसतो, तर एकामागून एक दोन दोन वर्षांच्या अंतराचे तीन मुलगे दंगामस्ती करीत तिथे आले. शेठजीने त्यांना आवरले आणि त्या तिघांनाही नारदाच्या पायावर घातले. नारद आश्चर्यचकित झाला.

" शेठजी, ही भाऊबंदातली मुलं आणलीत की काय पोसायला ? "

" नाही महाराज ! हे तीन्ही मुलगे आमचेच आहेत. एका शिणीचे, एका चणीचे. मोठी हुपार आहेत मुलं. मला धंदा करायला तिप्पट जोर आला आहे आता. तिघांनाही भरपूर देणार आहे; भरपूर ठेवणार आहे. "



" कसं झालं हे ? मला तर विष्णूने अन् ब्रह्मदेवाने सांगितलं होतं की तुमच्या नशिबात संतान नाही."

" एका साधुपुरुषाने हे वरदान दिलं आम्हांला. "

" मला सांग काय घडलं ते. "

" सांगतो. योगायोगाने एक साधुपुरुष एके दिवशी आमच्या घरी आला. अवलिया होता. कुठून आला देव जाणे ! पण आला खरा. त्याच्या मुखावर तेज झळकत होतं. वाणी गंभीर होती. त्याला तहान भुकेची पर्वा नव्हती. आम्ही त्याला बळेबळे घरात ठेवून घेतलं. मनोभावे किती तरी दिवस त्याची सेवा चाकरी केली. आम्ही त्याच्याकडे काहीही मागितलं नाही. आमची व्यथा त्याला सांगितली नाही. असे काही महिने गेले. साधू मला वाटतं, एका ठिकाणी राहायला कंटाळला. जाताना आम्ही त्याला नमस्कार केला. त्याने लगेच आशीर्वाद उच्चारला.

" शेठजी, तुला तीन मुलगे होतील ! "

" आणि खरोखरच तसं घडलं. एका वर्षाच्या आत आम्हांला पहिला मुलगा झाला. मग दुसरा, मग तिसरा. तीघे कसे ठणठणीत. जन्मल्यापासून कोणाच्या कपाळाला सुंठ लागली नाही. आमचा संसार आता सोन्याचा झाला आहे. "

नारदाला हे सगळेच नवल होते, अद्भुत होते. याचा छडा लावायलाच हवा होता. नारद उठला. त्याने वैकुंठाची वाट धरली. विष्णू त्याला म्हणाला.

" आज का येणं केलंस ? "

" आलो एक शंका फेडून घ्यायला. तुम्ही अन् ब्रह्मदेवाने मला निक्षून सांगितलंत की शेटजीच्या कपाळी पुत्राचा लेख नाही. मग हे कसं घडलं ? "

" काय घडलं ? "

" शेटजीला एकामागून एक तीन मुलगे झाले आहेत. हे अघटित कसं घडलं ? कोणी घडवलं ? "

विष्णू क्षणभर अवाक् झाला. थोडा वेळ चिंतन करून त्याने म्हटले.

" माझ्या एखाद्या भक्ताने त्याला मुलगे दिले असतील. "

" म्हणजे ? देवाहून भक्त श्रेष्ठ ? देवाहून भक्त अधिक समर्थ ? "

" होय. तसंच आहे. भक्ताचं सामर्थ्य देवालाही मोजता येत नाही. भक्त जगाला मोठं करतो; नव्हे. देवालाही मोठा करतो. "

" मला प्रचीती हवी ! " नारद म्हणाला.

" चल दाखवतो. " विष्णू म्हणाला.

तो साधू कुठे राहतो, कसा राहतो, हे विष्णूने अंतःज्ञानाने जाणून घेतले. नारदाला बरोबर घेऊन विष्णू निघाला. पृथ्वीवर आला. एका खेडेगावात पोचला.

एवढ्यात आकाश काळ्याकुट्ट ढगांनी भरून आले. एकाएकी गडगडाट सुरू झाला. पाठोपाठ मुसळधार पाऊस पडू लागला. ओढे नाले फुंफाटत वाहू लागले. तशातच विजांचा चमचमाट. क्षणभर लख्ख व्हायचे की पुन्हा काळा कभिन्न अंधार. तशातच रात्र झाली. सारे गाव अंधारात बुडून गेले. पावसाने न्हाऊन निघाले.

साधूची झोपडी गावाच्या कडेला होती. चंद्रमौळी हेच तिचे वर्णन. वर केंबळी छप्पर. दार म्हणून मोडकी तोडकी ताटी. नारद आणि विष्णू त्या झोपडीच्या दारात उभे राहिले. त्यांनी आता वेष पालटले होते. दोघेही ब्राह्मण वाटसरू बनले होते.

" साधुमहाराज ! कवाड खोला. आम्ही पांथस्थ आहो. आम्हांला तुमचा आसरा हवा आहे. आम्ही भिजून कुडकडतो आहो. लवकर कवाड उघडा."

" साधूने कवाड उघडले. दोघे आत शिरले. साधू त्यांना ' बसा ' म्हणाला. पण त्या टीचभर झोपडीत बसायला कुठे टीचभरही कोरडी जागा नव्हती. साधूच्या कमरेला एक लंगोटी, अंगावर एक पंचा. पण ती दोन्ही वस्त्रे ओली चिंब झाली होती. साधू गारठ्याने कुडकुडत होता. अन् पाहुणेही गारठले होते. अजून पाऊस थांबला नव्हता. साधूच्या छपरातून त्याच्या धारा सरळ आत येत होत्या. हे सगळे पाहात असूनही विष्णू म्हणाला.

" साधुमहाराज, आम्हाला शेकोटी करून द्या. आम्ही गारठून

मरायला निघालो आहो."

साधू म्हणाला.

" पाहुणे, तुम्ही मला देवासमान आहा. प्रत्यक्ष देवच आहा. पण मी काय करू? घरात एकही लाकूड नाही. बाहेरच्या काटक्या कुटक्याही ओल्या गार झाल्या आहेत. जळण मिळालं तरी ते पेटवायला विस्तव नाही. मला फार फार दुःख होतं आहे."

" ते काही नाही. आम्हाला आत्ताच्या आत्ता शेकोटी पेटवून दे." विष्णूने आग्रह धरला.

साधू क्षणभर स्तब्ध बसला. त्याच्या मनात अनंत विचारांचे काहूर माजून गेले. शेवटी त्याने ठरवले. पाहुण्यांना शेकोटी पेटवून द्यायचीच. पण काय करणार होता तो? कुठून लाकडे आणणार होता? कुठून विस्तव आणणार होता? या गोष्टी शक्य कोटीतल्या नव्हत्याच. आणि अजूनही धूमधार पाऊस पडतच होता. विजा कडाडतच होत्या.

साधू आसन घालून बसला. त्याने देवाचा मनोमन धावा सुरू केला. चित्त एकाग्र केले. योगमार्गाने आपले शरीर म्हणजे सुके काष्ठ बनवले. मग आपल्या भक्तीच्या सामर्थ्याने बाहेरच्या विजेला आत बोलावले. पुन्हा वीज कडाडली. तिचा एक लोळ झोपडीत शिरला. साधूच्या देहाला भिडला. कापुराप्रमाणे साधूच्या देहाने पेट घेतला. त्या ज्वाळांतून मोजकेच शब्द उमटले.

...५...

" वैकुंठीच्या देवा, नारदमुने ! शेकोटी बनली. आता तुम्ही जवळ बसून भरपूर ऊब घ्या ! "

विष्णूने ते दृश्य पाहून नारदाकडे बघितले.

" नारदा, पाहिलीस प्रचीती ? असा भक्त एखाद्याला मुलगाच काय, पण त्रिभुवनाचं साम्राज्यसुद्धा देऊ शकेल."

" प्रभो, तुमचं म्हणणं खरं आहे." नारदाने म्हटले. त्याच्या आश्चर्याला पारावार उरला नाही.

आणि मग लगेच विष्णूने निजरूप प्रकट केले. आपला वरदहस्त त्या जळत्या साधूच्या अंगावरून फिरवला. आग विझली. साधूचा देह शांत झाला. तो सुवर्णासारखा झळकू लागला. ना व्यथा ना वेदना ! ना फोड ना डाग. जसे काही घडलेच नाही. साधू उठला. देवाच्या पायां पडला. म्हणाला.

" प्रभो, तुझ्याच कृपेने आज माझं सत्त्व राहिलं. परीक्षा घ्यायला का होईना, पण तू मला भेटायला आलास. मी धन्य झालो, कृतार्थ झालो ! "

म. वं. मं. ठाणे, बालमालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
ग्रा. क्र. २८४२ दिनांक ९/६/८३
विषय ०११·वी क्र. ........

# शहाणपण दे गा देवा—

तमिळनाडमधला एक जमिनदार. मोठा मातबर. गाडी-घोडी बाळगून राहणारा. तो शेतीत जिवापाड कष्ट करी अन् करवून घेई. त्यामुळे त्याची शेते भरपूर पिकत. भरपूर धान्य घरात येई. ते विकून त्याला खूप पैसा मिळे. घर दार भरलेले असे. कशाची कुठेच कमतरता नसे. पण त्या घरात आयापेक्षा खर्चच अधिक होता.

जमिनदाराला दोनच मुले. एक मुलगा अन् एक मुलगी. ती बहीण भावंडे एकमेकांवर जिवाआगळे प्रेम करीत. अशी ती दोघे त्या घरात वाढली. योग्य वेळी बहिणीचे लग्न ठरले. तिला श्रीमंत स्थळ मिळाले. सासरी जाताना ती भावाला म्हणाली.

" दादा, आता थोड्याच दिवसांनी तुझंहि लग्न होईल. तुला छान छान नवरी मिळेल. तुझा संसार सोन्याचा होईल. पण तुला एक सांगू का ? आपण एक करार करू या. तुझ्यात अन् माझ्यात..."

" कसला करार ? " भावाने विचारले.

" तुला मुलगी झाली तर ती तू माझ्या मुलाला द्यायचीस. अन् मला मुलगी झाली तर ती मी तुझ्या मुलाला देईन. म्हणजे आपला नातेसंबंध पुढील पिढ्यांतही चालू राहील. कबूल ? "

भाऊ म्हणाला, " कबूल."

योग्य वेळी भावाचेही लग्न झाले. त्याला झाला मुलगा. अन् बहिणीला झाली मुलगी. पण परिस्थितीत एकाएकी बदल घडला. एके दिवशी तो जमिनदार अचानक मेला. इतके दिवस त्या बहिण भावंडांना पत्ता नव्हता की आपला बाप म्हणजे ' बडा घर पोकळ वासा ' आहे. पण ते खरे होते. त्याला डोंगराएवढे कर्ज होते. तो मरताच भराभर सगळे सावकार आले. आणि त्यांनी जमिनदाराचे घर धुवून नेले. शेतीवाडी, बैल-बारदाना सगळेच सावकारांनी बळकावले. बहिणीचा भाऊ एकदम गरीब झाला. मोलमजुरी करून कसेबसे दिवस घालवू लागला. एवढे मोठे घर, पण ते आता त्या कुटुंबाला खायला येऊ लागले. त्यातला केरही रोजच्या रोज निघेना. दुपार कशी निभेल अन् संध्याकाळ कशी साजरी होईल, या विवंचनेत त्यांना दुसरे काहीच सुचेना.

आपला भाऊ गरीब झाला, सर्वस्वाला मुकला, हे बहिणीला समजले. पण आता तिची मती फिरली. ती भावाकडे कधी फिरकली नाही, की तिने त्याचा तोंडदेखला समाचारही घेतला नाही. तिचे घर संपत्तीने भरून ओसंडत होते, पण भाऊभावजयीला एखादे धडुते तरी पाठवावे, असे तिला कधीच वाटले नाही. ती आपल्याच तोऱ्यात राहिली. ' तुमचा भाऊ काय करतो, तो तुमच्याकडे कधीच का येत नाही,' असे कोणी विचारले तर ती नुसतेच तोंड फिरवी.

पण जेव्हा तिने आपल्या मुलीचे लग्न करायचे ठरवले, तेव्हा मात्र एके दिवशी भाऊ तिच्याकडे आला. बहिणीने त्याला ' ये ' म्हटले नाही, ' बस ' म्हटले नाही, की साधे गूळपाणीसुद्धा त्याच्यापुढे ठेवले नाही. भावाला त्या गोष्टीचे फार दुःख झाले. तो म्हणाला,

" आक्का, मला विसरलीस ? "

" विसरले नाही. पण तुझ्या माझ्या स्थितीत आता एवढा फरक पडला आहे, की मला तू माझा भाऊ म्हणून सांगायलाही लाज वाटते. भाऊ म्हणून तुझी मी आवभगत केली, तर शेजारी पाजारी माझी नाचक्की करतील. एवढ्यानं काय ते तू समज अन् इथून निघून जा."

" जाणारच आहे मी ! पण मी कशासाठी आलो, एवढं तरी विचारशील ? "

" आला असशील पैसे मागायला नाही तर तांदूळ मागायला."

" अग, ती तर माझी नेहमीचीच रड आहे. पण मी त्यासाठी आलो नाही. तुझी मुलगी वेंकम्मा. ती आता मोठी झाली आहे, अन् तू तिचं लग्न करायला निघाली आहेस."

" त्याच्याशी तुला काय कर्तव्य ? "

" तू मला वचन दिलं होतंस. मी न मागता दिलं होतंस. म्हणाली होतीस की, मला मुलगी झाली, तर मी ती तुझ्या मुलाला देईन. आठवतं ? "

" आठवतं. पण ती परिस्थिती आता पालटली. तुझ्यासारख्या भणंग भिकाऱ्याच्या घरी मुलगी द्यायला माझी मुलगी काही वर आलेली नाही. तिला मी आमच्याहीपेक्षा मोठं तोलामोलाचं घर पाहिलं आहे."

" ठीक आहे; तुझी मर्जी. मी फक्त तुला तुझ्या वचनाची आठवण द्यायला आलो होतो. तुझा शब्द तू मोडलास, जातो मी. "

बहिणीने केलेला अपमान भावाने मुकाट्याने गिळला. तो भांडला नाही, तंडला नाही, आला तसा निघून गेला. बहीण म्हणाली, ' एक पिडा टळली. '

वेंकम्माने भावाबहिणीचा संवाद आतून ऐकला होता. तिला तो प्रकार बरा वाटला नाही. वेंकम्मा त्या घरात वेगळ्या

जातीची, वेगळ्या स्वभावाची होती. ती पुढे आली अन् म्हणाली.

" आई ! "

" काय बेटी ! "

" मामा आला होता ? "

" होय. "

" तू त्याला वचन दिलं होतंस ? "

" अं ऽऽ ! "

" खरं सांग आई ! "

" होय, दिलं होतं. पण पोरपणात दिलेली तसली वचनं अमलात आणायची नसतात. शिवाय आता त्या घरी गोळाभर अन्न मिळण्याचीसुद्धा मारामार ! "

" ते काही असलं तरी तुला हे वचन पाळायला हवं आई ! हे पाप तुला बाधेल अन् मलाही बाधेल. "

" म्हणजे ? तुला काय म्हणायचं आहे ? "

" ते तुला बरोबर समजलं आहे. उगाच कानावर केस ओढू नकोस. "

" मी प्राण गेला तरी तुला त्या घरी देणार नाही. मला शहाणपण शिकवू नको."

" नाही शिकवीत. पण एक सांगते, मी दुसऱ्या स्थळी लग्नाला उभी राहणार नाही ! "

" फार बोललीस. दोन तोंडात खाशील आता. चालती हो इथून."

" माझा निर्धार पक्का आहे ! "

आई एकदम चकित झाली. पोरीचे हे रूप तिला नवे होते. काही बोलताच येईना. तिने हा सारा प्रकार आपल्या नवऱ्याच्या कानी घातला. तोही बिथरला. घरातले वातावरण तापले. वेंकम्माला धाकदपटशा सुरू झाला. तिला कोंडून घातले, मारले, उपाशी ठेवले. पण तिने डोळ्यांतून टिपूससुद्धा काढला नाही. तिचा आपला एकच ठेका : ' मला दुसरीकडे लग्न करायचं नाही ! '

शेवटी समजावणी सुरू झाली. आईने कुरवाळले. बापाने पाठीवरून हात फिरवला. ' पोरी, तुझे हाल होतील. तुला उपास पडतील, प्रसंगी भीक मागावी लागेल.' असा बऱ्याभल्याचा उपदेशही केला. त्यावर वेंकम्माचे एकच उत्तर– ' मी अन् माझं नशीब ! माझ्यासाठी तुम्ही पापाचे धनी होऊ नका. दिलं वचन मोडू नका.'

असे सगळे उपाय थकले. शेवटी बहिणीने नाक मुठीत धरून भावाला निरोप धाडला—

“ वऱ्हाड घेऊन ये. मी माझी मुलगी तुझ्या मुलाला देणार आहे.”

भावाला परम हर्ष झाला. तो चार माणसे घेऊन लग्नाला आला. ते लग्न झाले. पण त्यात कसलाही थाटमाट नव्हता. वेंकम्माच्या आईबापांनी रडत कन्यादान केले. वेंकम्माची आई दुःखाने होरपळली अन् अपमानाने जळफळली. एवढी श्रीमंती असून दरिद्री भावापुढे तिला नाक मुठीत धरून वाकावे लागले होते.

वेंकम्मा सासरी आली. संसारात प्रेम घेऊन आली, गोडी घेऊन आली. सगळ्यांना कौतुकाची कमळण झाली. माहेर श्रीमंत, सासर गरीब. तिने तशी कोणाला जाणीवही करून दिली नाही. पाल्या-पाचोळ्याच्या भाजीबरोबर ती वाट्याला येईल तेवढा भात आनंदाने जेवी. तेवढ्यावरच ढेकर देई. आळस झटकून घरातली सगळी कामे करी.

माहेरच्या माणसांनी तिचे नाव टाकले. दिली तेव्हाच मेली असे मानले. कोणत्याही सणाला तिला ‘ मूळ ’ धाडले नाही. तिचा समाचार घ्यायला माहेरचा काळा कुत्रासुद्धा तिच्या घरी फिरकला नाही.

वेंकम्माला काही तरी उद्योग हवा होता. तिने पत्रावळी लावायचे ठरवले. बाप-लेकांनी पाने आणून द्यायची अन् सास्वा-सुनांनी बसून त्यांना टाके घालायचे. पोटापुरता धंदा सुरू झाला.

सतत उद्योग अन् मिळेल त्यात समाधान, अशा वृत्तीने ते कुटुंब आपली गुजराण करू लागले.

आणि मग एके दिवशी एक विलक्षण घटना घडली.

* * *

त्या देशाचा राजा एका पुण्य पर्वणीच्या दिवशी नदीवर स्नानाला आला. पात्रात उतरण्यापूर्वी त्याने आपल्या बोटातली एक मौल्यवान आंगठी काढली आणि नदीच्या तीरावर ठेवली. मग त्याने खोल पात्रात जाऊन पाण्यात बुडी मारली. वर येऊन पाहतो तर आंगठी गायब. एका गरुडाने झडप घालून नेमकी आंगठी चोचीने उचलली अन् आकाशात भरारी मारली. आता त्या गरुडाला पकडायचे कसे अन् ती आंगठी मिळवायची कशी? ती आंगठी खाण्याच्या उपयोगाची नाही हे समजून गरुड कुठे तरी ती टाकणार अन् निघून जाणार, हे राजाने जाणले. पण तिचा ठावठिकाणा कळायचा कसा?

राजा बहुत दुःखी झाला. कारण ती आंगठी शकुनाची होती. तिच्या कोंदणात एक बहुमूल्य हिरा बसवलेला होता. ती आंगठी बोटात चढवल्यापासून राजाला विजयामागून विजय मिळत गेले होते. त्याचे भांडार सोन्यानाण्यांनी भरून गेले होते. राज्यातला उपद्रव शमला होता. सगळे काही चांगले आणि सुखावह झाले होते.

अशी ती शकुनी आंगठी हातोहात नाहीशी झाल्यामुळे राजाला अन्नपाणी गोड लागेना. एक प्रयत्न करून पाहायचा म्हणून त्याने ढोलके पिटून राज्यात दवंडी देववली—

" ऐका हो ऐका ! समस्त लोक ऐका. राजाची हिरेजडित आंगठी गरुडाने पळवली आहे. ती ज्याला सापडेल त्याने राजवाड्यात आणून द्यावी. आंगठी आणून देणाऱ्याला तो मागेल ते बक्षीस मिळेल होऽऽऽ ! "

आणि ती आंगठी वेंकम्माला नेमकी तिच्या परसात मिळाली. सोन्याची आंगठी. कोंदणात लकाकता हिरा. पाठोपाठ राजाची दवंडीही तिने ऐकली. लगेच तिने ती आंगठी पदराच्या टोकाला बांधली आणि पदर पोटाशी खोचला. मग ती नवऱ्याजवळ गेली अन् त्याला म्हणाली,

" राजाची आंगठी मला सापडली आहे. आपण राजवाड्यात जाऊन ती राजाला परत करू. राजा आपण मागू ते बक्षीस देणार आहे."

" खरंच तुला आंगठी सापडली ? अग मग फार छान झालं. आपण राजाकडे खूप द्रव्य मागू. श्रीमंत होऊ."

" काय मागायचं ते मी मागणार आहे. तुम्ही मध्ये काही बोलायचं नाही. मला काही विचारायचं नाही. आहे कबूल ? "

नवऱ्याचा वेंकम्माच्या शहाणपणावर विश्वास होता. त्याने

म्हटले, "तुला हवं ते माग. मी तोंड उघडणार नाही. या घरातली कर्ती तू."

वेंकम्माला बरे वाटले. ती दोघे मिळून राजवाड्यात गेली. द्वाररक्षकाला त्यांनी सांगितले की "आम्हांला राजाची आंगठी मिळाली आहे, अन् आम्ही ती द्यायला आलो आहो."

द्वाररक्षकाने आत वर्दी दिली. राजाकडून त्यांना लगेच बोलावणे आले. ती दोघे राजापुढे आली. नमस्कार करून उभी राहिली.

"तुम्हांला आंगठी मिळाली आहे?"

"होय महाराज!" वेंकम्मा म्हणाली.

"आण ती इकडे." राजा बोलला.

वेंकम्माने राजाच्या हाती आंगठी दिली. राजाने ती मागून पुढून तपासून पाहिली. काही फसवेगिरी नाही ना, याची खात्री करून घेतली. झालेला आनंद त्याला लपवता आला नाही. त्याने त्या दोघांना शाबासकी देऊन विचारले.

"बोला, तुम्हांला काय हवं?"

"महाराज, माझी मागणी तुम्हांला विचित्र वाटेल. तुम्ही कदाचित रागावाल. आम्हांला घालवूनही द्याल—"

"नाही देणार! तू निस्संकोच बोल!"

वेंकम्माला धीर आला. तिने एकवार आवंढा घोटला, घसा साफ केला अन् आपले मागणे मागितले.

" महाराज, येत्या शुक्रवारी रात्रौ राज्यातल्या एकाही घरात दिवा लागता कामा नये. राजवाड्यातसुद्धा प्रकाश होता कामा नये. दिवा लागेल, प्रकाश होईल तो एकट्या माझ्या घरी !... महाराज, इच्छा असेल तर हे माझं मागणं पुरवा. नाही तर आम्ही निघून जातो. "

वेंकम्माची मागणी राजाला वेडगळपणाची वाटली हे खरे; पण राजा वचनबद्ध होता. ' मागाल ते मिळेल ' अशी त्याने दवंडी पिटवली होती. त्यामुळे त्याने वेंकम्माला तसे वचन दिले आणि पुन्हा एकदा तशी दवंडी पिटायला सांगितले.

वेंकम्मा राजाचा निरोप घेऊन बाहेर आली. आपल्या घराकडे निघाली. तिचा हर्ष गगनात मावत नव्हता. खट्टू झाला होता तो तिचा नवरा. तो म्हणाला.

" मागायचं मागून काय मागितलंस हे ? तू वेडी आहेस का ? "

" मी वेडी नाही, हे तुम्हांला येत्या शनिवारी सकाळी कळेल. तोवर धीर धरा." वेंकम्माने आपल्या नवऱ्याला समजावले.

दुसऱ्या दिवशी वेंकम्माने तेल्याकडून तेल विकत आणले. कुंभाराकडून खूप पणत्या खरेदी केल्या. बराचसा कापूस गोळा

करून त्याच्या बोटवाती वळल्या. एवढे करून ती शुक्रवाराची वाट पहात राहिली.

शुक्रवार उजाडला. आज घरातल्या सर्वांनाच काही तरी नवे नवे वाटत होते. वेंकम्मा मात्र थोडी गंभीर होती. तिने सकाळी स्नान केले. घरच्या देवावर फुले वाहिली. तुळशीला पाणी घातले. स्तोत्र म्हणून तिला प्रदक्षिणा केल्या. त्या दिवशी दुपारी सगळी जेवली; पण तिने मात्र कडकडीत उपास केला.

हळूहळू सूर्य कलला. योग्य वेळी मावळला. संधिप्रकाशही ओसरला. अंधार हळूहळू दाट होऊ लागला. वेंकम्माला हवी होती. ती रात्र उगवली. ती अधिक गंभीर झाली. शहरभर अंधाराचे साम्राज्य पसरले. वेंकम्मा तशा त्या अंधारातूनच चार दोन गल्लीबोळात हिंडून आली. सगळीकडे सामसूम होते. लहान, थोर सगळी माणसे सूर्यास्तापूर्वीच जेवणखाण उरकून चिडीचिप झाली होती. शहरात कुठेही प्रकाशाची तिरीपसुद्धा नव्हती. राजवाडाही अंधाराने माखला होता.

हे सगळे अंधाराचे साम्राज्य पाहून वेंकम्मा खूष झाली. लगबगीने घरी आली. तिने भराभरा सगळ्या पणत्या पेटवल्या. आंगणात, तुळशीकट्टयावर, परसदारी, घरातल्या सगळ्या खोल्यांत, देवापुढे, सगळीकडे तिने दीपाराधना केली. सगळीकडे त्या पणत्यांचा मंद मंगल प्रकाश अंधार उजळीत राहिला.

मग तिने सासऱ्याला बोलावून घेतले. त्याला पुढील दारी

उभे केले. दार उघडे ठेवले. मागील दारी नवऱ्याला उभे केले. तेही दार उघडे ठेवले. नवऱ्याला अन् सासऱ्याला काही तरी कानगोष्ट सांगितली. दोघेही ‘ बरे ’ म्हणाले. वेंकम्मा आपल्या सासूला घेऊन देवापुढे बसली.

रात्रीचा एक प्रहर उलटला. दुसरा प्रहरही संपायला आला. एवढ्यात एक स्त्री पुढच्या दरवाजात येऊन उभी राहिली. चाफ्याच्या वर्णाची. भरजरी वस्त्र ल्यालेली. अंगभर रत्नजडित दागिने घातलेली. आपादमस्तक रत्नांच्या प्रकाशाने झळाळणारी. कपाळी कुंकवाचा मळवट. पायात जोडवी पोल्हारे.

तिला पाहून वेंकम्माचा सासरा सावध झाला. प्रथम थोडासा गांगरला; पण मग दार अडवून उभा राहिला. कारण वेंकम्माने जसे सांगितले तसे घडले होते. ती स्त्री वेंकम्माच्या सासऱ्याला म्हणाली.

“ मला तुमच्या घरात यायचं आहे. मला वाट दे.”

“ तू कोण ? ”

“ मी साक्षात् लक्ष्मी आहे. मला अंधार आवडत नाही. आज रात्री सगळे शहर अंधारात बुडालं आहे. प्रकाश आहे तो फक्त तुझ्या घरी.”

“ मी तुला आत सोडीन. पण त्याआधी मला तुझ्याकडून एक वचन हवं आहे.”

“ कसलं वचन ? ”

“ या घरातून कधीही बाहेर न जाण्याचं.”

“ ठीक आहे. मी या घरातून कधीही बाहेर जाणार नाही.”

मग सासरा बाजूला झाला. लक्ष्मी घरात आली. एक गोष्ट वेंकम्माच्या मनाप्रमाणे पार पडली.

एवढ्यात पाठीमागच्या दाराशी खुडबुड झाली. एक स्त्री दाराच्या आत उभी राहिली. जख्खड म्हातारी. काळी कळकट. डोळे मोठे अन् लाल. दात पुढे. जुने फाटके वस्त्र. केस पिंजारलेले. तिला पाहून वेंकम्माचा नवरा घाबरला. त्याला घाम फुटला. वेंकम्माने सांगितले, तसेच झाले होते. ती वेंकम्माच्या नवऱ्याला क्षीण आवाजात बोलली,

“ बाजूला हो, मला बाहेर जाऊ दे.”

“ कोण तू ? ” वेंकम्माच्या नवऱ्याने विचारले.

“ मी आक्का ! थोरली बहीण.”

“ कोणाची आक्का ?. कोणाची बहीण ? ”

लक्ष्मीची. ती बघ पुढच्या दाराने घरात आली आहे. तिचं माझं कधीच पटत नाही. ती असेल तिथे मला राहता येत नाही. आजवर या घरात सुखाने राहिले. तुझा आजोबा कर्जबाजारी. बाप घरबश्या. तूही त्यातलाच. त्यामुळे इथे कसा छान

अंधार होता. मी मजेत होते. पण तुझी बायको वेगळी ठरली. तिने मोठ्या युक्तीने लक्ष्मीला या घरात खेचून आणलं. लक्ष्मीला पाहिलं की माझ्या अंगाची आग होते. मी तिथून पळत सुटते. आताही पळणार आहे. सोड माझी वाट."

"सोडीन; पण एका अटीवर!"

"लवकर बोल तुझी अट."

"पुन्हा या घराकडे कधी फिरकायचं नाही की इकडे वाकडा डोळा करून पाहायचं नाही."

"नाही येणार! नाही पाहणार."

"मग जा." वेंकम्माच्या नवऱ्याने म्हटले अन् ती अक्काबाई बाहेर पडल्यावर दार लावून घेतले.

मग घरातली सगळी माणसे एकत्र झाली अन् खाऊन पिऊन झोपी गेली. हळूहळू रात्र संपून सकाळ झाली. सगळीकडे प्रकाश पसरला.

सासू उठून कोठीच्या खोलीत गेली. पाहते तर सगळी भांडी सोन्याच्या नाण्यांनी भरलेली. घरभर सगळीकडे मोहरांचा सडा. सगळीकडे पिवळी पिवळी लक्ष्मी. सगळ्यांना आश्चर्याचा धक्का बसला! सासू धावत पुढे आली आणि तिने वेंकम्माची अलाबला घेतली. सासरा आला आणि तोही तिचे कौतुक करू लागला. एका घटकेत त्या दरिद्री घराची कळा पालटली. आता कशाची कशाची ददात उरली नाही.

नवरा पुढे आला अन् वेंकम्माला म्हणाला.

“ मी तुझा कालचा सगळा प्रकार पाहून अन् राजाकडे तू जी विचित्र मागणी केलीस ती ऐकून तुला वेड्यात काढलं होतं. पण अखेर तूच शहाणी ठरलीस. ”

“ ठरले ना ? झालं तर. ‘ शहाणपण देगा देवा ’ ” !

म. पं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २८४२ दिनांक 9/8/83
विषय बा.क. क्र...........

BVBK-0402842